आर्थिक | राजकीय | सामाजिक घडामोडींचा मागोवा...

# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

२१०



# निवडणुका मागचे पाढे पंचावन्न

# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्याचे पाक्षिक

वर्ष २८ । अंक २१ । ६ फेब्रुवारी २०१२

**मूल्य : ₹ १०**

संपादक
**सुरेशचंद्र म्हात्रे**

कार्यकारी संपादक
**श्रीकांत उमरीकर**

सल्लागार संपादक
**डॉ. मानवेंद्र काचोळे**
**डॉ. गिरधर पाटील**

साहाय्यक संपादक
**ज्ञानेश्वर शेलार**

मुखपृष्ठ/अंक मांडणी
**श्रीकांत झाडे**

**वार्षिक वर्गणी : ₹ २०० केवळ**

**(टीप : वर्गणीदारांनी अंकासंबंधी तक्रार असल्यास खा-लील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.)**

**संपर्क :** कार्यकारी संपादक, पाक्षिक शेतकरी संघटक, जनशक्ती वाचक चळवळ, २४४-समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१, फोन : ०२४०-२३४१००४.
ईमेल : shetkarisanghatak@gmail.com

● हा अंक मालक परदेशी मोहन बिहारीलाल यांच्यासाठी संपादक, मुद्रक, प्रकाशक म्हात्रे सुरेशचंद्र पी., मु.पो. आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे ४१०५०१ यांनी उदय एंटरप्राईजेस, ७० सी, सर्व्हिस इंडस्ट्रीज टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद ४३१००३ येथे छापून जनशक्ती वाचक चळवळ, 'पिनाक', समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१ येथे प्रकाशित केला. ● अंकाची प्रसिद्धी दर महिन्याच्या ६ व २१ तारखेला. ● अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.




## अंतरंग


जागरण
**सहकारी साखर चळवळीची शोकांतिका**
**निर्बंधमुक्त साखर आणि निर्बंधभक्त साखरसम्राट**
शरद जोशी ........ ३

आजकाल
**निवडणुका : मागचे पाढे पंचावन्न**
ज्ञानेश्वर शेलार ........ ८

वाङ्मय शेती
**गाय, वाघ आणि स्त्री**
गंगाधर मुटे ........ ११

मुद्दा
**अशी कशी जाईल महागाई?**
गिरधर पाटील ........ १३

कॉमन नॉन सेन्स
**डळमळीत प्रजासत्ताक**
सुधाकर जाधव ........ १४

**शेतकरी संघटना वृत्त** ........ १५

# साखरेची नियंत्रणमुक्ती : पापाची कबुली

ज्येष्ठ मराठी कादंबरीकार भालचंद्र नेमाडे यांना एका मुलाखतीत प्रश्न विचारला होता, 'वाचनसंस्कृतीसाठी काय करायला हवे?' तेव्हा नेमाडे उत्तरले होते, 'काही नाही, सरळ वाचनच करायला हवे!' नेमाडे यांच्या या साध्या उत्तरात एक मोठी खोच आहे. आज जे काही संम्मेलनं आणि तत्सम कार्यक्रमांच्या रूपाने चालू आहे. त्यातून वाचनसंस्कृतीला काहीच फायदा होत नाही. ही खंत नेमाड्यांना व्यक्त करायची होती. शेतीप्रश्नांच्याबाबतीतसुद्धा काहीसा असाच प्रकार आहे. बत्तीस वर्षांपूर्वी शेतीसाठी काय करायला पाहिजे, या प्रश्नाला शरद जोशी यांनी दिलेलं उत्तर 'काहीच नाही, शेतमालाला भाव मिळू दिला पाहिजे. साखर उद्योग नियंत्रणमुक्त करण्याच्या हालचाली सुरू झालेल्या आहेत त्यावरून हेच लक्षात येतं, की गेली कैक वर्षे उसाला भाव भेटू नये म्हणूनच हा सगळा उपद्व्याप चालू होता. आज शेवटी परिस्थिती पूर्णपणे हाताच्या बाहेर गेल्यावर शहाजोगपणे शासन साखर उद्योग नियंत्रणमुक्त करण्याच्या गप्पा करीत आहे. तिकडे नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष माँटेकसिंग अहलुवालिया अनुदानात कपात केल्याशिवाय पर्याय नाही, अशी विधानं करीत आहेत. कृषिमंत्री शरद पवार अन्नसुरक्षा विधेयकाचे कायद्यात रुपांतर करताना अस्वस्थ आहेत, यासाठी लागणारी प्रचंड सबसिडी आणायची कुठून, त्याहीपेक्षा शेतकरी असल्यामुळे त्यांना पडलेला मूलभूत प्रश्न फार महत्त्वाचा आहे. तो म्हणजे मुळात अन्नधान्य उपलब्ध होण्याची काय खात्री. या सगळ्याचा विचार केल्यावर आता असं लक्षात येतं आहे, ३०-३२ वर्षांपासून शरद जोशी आणि शेतकरी संघटना ज्या मुद्द्यासाठी प्राण पणाला लावून लढत आहेत, त्याच मुद्द्यापाशी सगळे येऊन थांबले आहेत. कृषी उद्योगाला कुठलीही भीक नको होती. मुळात 'भीक नको, हवे घामाचे दाम' अशी सरळ साधी वाटणारी; पण अतीशय गंभीर अर्थ असलेली घोषणा शेतकरी चळवळ देत होती. त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले. आता जागतिक पातळीवरती प्रचंड मोठ्या उलथापालथी चालू आहेत. व्यापारविषयक धोरणं विविध दिशेने जाताना दिसत आहेत. आंतरराष्ट्रीय दबाव प्रचंड वाढत चालला आहे. भारतापुरतं जे काही शोषण करायचं होतं, जे काही ढोंग करायचं होतं. ते सगळं संपुष्टात आलं आहे. मनात इच्छा असूनही प्रशासनाचा पांढरा हत्ती पोसणं सरकारला आता शक्य उरलेलं नाही. केवळ मूठभरांचे पगार व्हावेत म्हणून करोडोंना वेठीस धरण्याचे दिवस आता पूर्णपणे संपले आहेत.




दि. १ फेब्रुवारीच्या दि टाइम्स ऑफ इंडिया मध्ये अजित निनान यांचे एक अप्रतिम व्यंगचित्र आले आहे. 'शासकीय फौजफाटा घेऊन एक मंत्री उघड्या वाघड्या, हाडाचा सापळा असलेल्या गावकऱ्यांसमोर उभा आहे आणि त्यांना सांगतो आहे. शासकीय कामांचा प्रचंड भार असल्यामुळे सध्या तुमच्यासाठी मला वेळ नाही. मी विरोधी पक्षात जाईपर्यंत वाट पाहा.' स्वतःचीच सेवा करावी हीच सध्या प्रशासनाची प्राथमिकता बनली आहे. ते जनतेची सेवा काय क रणार? ही परिस्थिती नवीन काळात शक्य उरली नाही. शासन पूर्णपणे कर्जबाजारी होऊन बसलेलं आहे. स्वतःच्या ओझ्याखाली ते पार दबून गेलेलं आहे, त्यामुळे इतरांचं आणि विशेषतः शेतकऱ्यांचं शोषण करावं अशीही ताकद त्याच्यात आता फारशी उरली नाही. या पार्श्वभूमीवरती साखर उद्योग नियंत्रणमुक्त करण्याच्या हालचाली लक्षात घ्यायला हव्यात. वर्षानुवर्षे विविध योजनांच्या नावाखाली नोकरशहा, राजकीय नेते, इतकंच नाही तर अगदी समाजसेवेची टिकली मिरवणाऱ्या सामाजिक संस्थाही सर्वसामान्यांचं शोषण करत राहिल्या. त्यांच्याच जिवावरती अनुत्पादक असलेला हा वर्ग उड्या मारत राहिला. प्रत्यक्ष उत्पादन करणारे उद्योजक, व्यापारी, शेतकरी यांची परिस्थिती दिवसेंदिवस कठीण होत गेली. जागतिकीकरणाच्या काळात ही परिस्थिती काहीशी पालटली. बाहेरच्या दबावाने का होईना उद्योगक्षेत्रात मोकळे वारे वाहायला लागले. सरकारची इच्छा नसतानाही लायसन-कोटा-परमिट राज त्यांना संपवावे लागले; पण हा दुष्टपणा शेतीच्या बाबतीत मात्र अजूनसुद्धा चालू आहे; पण आता तो चालू ठेवण्याची शक्यता दिवसेंदिवस संपुष्टात येते आहे; पण हे कबूल करायचं मनाचं मोठेपण सरकारमध्ये नाही आणि राजकीय नेत्यांमध्ये तर अजिबात नाही. आव मात्र असा आणत आहेत, आम्ही शेतीचं भलं करतो आहोत! सर्वसामान्यांचं भलं करत आहोत. अन्नसुरक्षा विधेयकाच्या बाबतीत अशीच गोची होऊन बसली आहे. हे सगळ्यांना पूर्णपणे माहीत आहे, की हे विधेयक कायद्यात रूपांतरीत झालं तर अन्नसुरक्षा प्रत्यक्षात देणे शक्य नाही, कुठल्याच पातळीवरती हे करता येणार नाही, पण तसं कबूल करणं राजकीयदृष्ट्या गैरसोयीचं आहे. साखर उद्योग नियंत्रणमुक्त करण्याची घोषणा उशीरा का होईना करावी लागणार आहे? त्याच पद्धतीने अन्नसुरक्षेच्या बाबतीतही आज नाही तर उद्या सरकारला उलटा निर्णय घ्यावा लागणार आहे. साखरेची लेव्ही उठवल्यावर रेशन यंत्रणेसाठी खुल्या बाजारातून साखर शासनाला खरेदी करावी लागेल, जी गोष्ट किती अशक्य आणि अव्यवहार्य आहे, हे सगळेच जाणतात, त्याच पद्धतीने अन्नसुरक्षेच्या बाबतही घडू शकेल, हे विधेयक कायद्यात रूपांतरीत झाल्यास पुरेसा अन्नसाठा अतिशय कमी दरात वाटप करण्यासाठी खुल्या बाजारातून तो खरेदी करावा लागेल. सध्या आजच असलेला अन्नसाठा साठवून ठेवण्याची कुठलीही यंत्रणा शासनाकडे नाही, मग या नवीन अन्नसाठ्याचं काय करायचं, याचं उत्तर शासनाकडे नाही, कायदा झाल्यावरती अगदी एखाद्या साध्या माणसानेही सर्वोच्च न्यायालयात या संदर्भात धाव घेतली, तर शासनाची फेफे उडेल, हे सांगायला भविष्यवेत्याची गरज नाही. शासनाने एकच करायला हवं. ढोंगीपणा सोडून शासनच करायचं हवं. इतर उद्योग पूर्णपणे बंद करायला हवेत. भालचंद्र नेमाडे म्हणाले तसं, वाचनसंस्कृतीसाठी वाचनच करावं लागतं. इतर पळवाटा काहीही कामा येत नाहीत. शासनाने सक्षमपणे शासनाचेच काम करावे, इतर सर्व कामे लोकांवरती सोपवून द्यावीत, फक्त त्यावर देखरेख ठेवावी. परत परत ही गोष्ट सिद्ध होत गेली आहे, की शासन विविध पातळ्यांवरती वारंवार अपयशी ठरत चाललेलं आहे. नवीन काळाची पावलं ओळखून हे बदल झाले नाहीत, तर सर्वसामान्यांचा संताप अजून वाढेल. त्याला तोंड देणार कसं?

# सहकारी साखर चळवळीची शोकांतिका

## साखर उद्योग लेव्हीमुक्त करण्याच्या प्रस्ताविक शासकीय धोरणाच्या पार्श्वभूमीवर मा. शरद जोशी यांचे पूर्वप्रकाशित लिखाण...



शरद जोशी

शासन शेतकऱ्यांच्या बाजूने असते तरी सहकारी कारखान्यांनी शेतकऱ्यांच्या भल्याची कामगिरी बजावली असती असे नाही; पण शासकीय धोरण शेतकऱ्यांविरूद्ध जाऊ लागले तर शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्याची कामगिरी सहकारी साखर कारखान्यांच्या बड्या पुढाऱ्यांची होती. सहकारी साखर कारखान्यांच्या पूर्ण इतिहासात शासनाचे धोरण शेतकरी हिताच्या विरोधी होते. एवढेच नव्हे तर ते शेतकरीद्वेष्टे होते. उसाचे उत्पादन तर वाढावे, साखरेचे उत्पादनही त्याबरोबर वाढावे; परंतु शेतकऱ्यांचा उत्पादनखर्च भरून येईल इतकी किंमत तर मिळू नये यासाठी शासनाने मोठ्या क्रूरपणे एक षड्यंत्र रचले. शेतीमालाला भाव मिळू नये म्हणून शासन गहू, कापूस, दूध, तेलबिया आणि डाळी या मालांच्या बाबतीत कसोशीने प्रयत्न करते पण उसाला भाव मिळू नये म्हणून शासनाने जो काही खटाटोप केला त्याची सर दुसऱ्या कोणत्याच क्षेत्राला नाही.

सहकारी चळवळीने शेतकऱ्यांचा उद्धार केला, सहकारी चळवळी म्हणजेच शेतकऱ्यांची एकमेव महत्त्वाची चळवळ हा विचार सहकारी साखर कारखान्यांच्या नेत्यांनी विशेष आग्रहाने मांडला आहे. साखर कारखाना काढावा, त्याच्या आधाराने पाण्याची व्यवस्था करून उसाखालचे क्षेत्र वाढवावे, लागवडीचे शास्त्रीय व्यवस्थापन करून ऊसशेतीची उत्पादकता आणि उसातील शर्करांश वाढवावा, वाहतूक आणि गळीत पूर्ण कार्यक्षमतेने चालवून साखरेचे उत्पादन वाढवावे म्हणजे ऊसउत्पादकांचे सर्वतोपरी कल्याण होईल अशी भूमिका सहकारी साखर कारखान्याच्या आद्य प्रणेत्यांनी मांडली होती. कारखान्यांची स्थापना केली आणि ते कार्यक्षमतेने चालवले म्हणजे कारखान्याच्या तिजोरीत जाऊन पडणारा फायदा शेतकऱ्यांच्या पदरी पडेल आणि त्यामुळे ऊस पिकविणाऱ्या शेतकऱ्याला त्याच्या मालाची चांगली, एवढेच नव्हे तर आकर्षक किंमत मिळेल ही सहकारी साखर कारखाने काढण्यामागची कल्पना आणि आशा होती.

पद्मश्री विखे पाटील, धनंजयराव गाडगीळ इत्यादींनी ही कल्पना बाळगली, राबवली, सहकारी कारखानदारीची सुरूवात झाली. सहकारी कारखानदारीने चांगले बाळसे धरले. महाराष्ट्रात ऐशींच्या आसपास सहकारी साखर कारखाने तयार झाले. महाराष्ट्रातील बागायती प्रदेश साखर कारखान्यांनी नटून गेले. सारा परिसर साखर कारखान्याची प्रचंड इमारत, आसपासच्या प्रदेशात बांधलेल्या गुळगुळीत सडका, विजेच्या दिव्यांची रोषणाई, शोभिवंत झाडांच्या बागा, शाळा, बाजारपेठा, बँका यांनी गजबजून गेला. विकासाची पेठ फुटली आहे अशी भावना तयार व्हावी असा चमचमाट दिसू लागला.

महाराष्ट्रात गेल्या पंचवीस-तीस वर्षांत उदयाला आलेले राजकीय नेतृत्व मोठ्या प्रमाणावर साखर कारखान्यातून उदयाला आले आहे. साखर कारखान्यांच्या एकूण कामगिरीविषयी कुणाचेही काहीही मत असले तरी शेतकऱ्यांच्या कमीजास्त शिकलेल्या पोरांची कारखान्याचा गाडा चालविण्याची कार्यक्षमता आणि ताकद त्यांनी सिद्ध केली यात काही शंका नाही. साखर कारखान्यांच्या बऱ्याच अध्यक्षांची दिनचर्या मी पाहिली आहे. त्यांच्या कामाचा व्याप, त्याची समज, कामाचा उरक, राजकीय हातोटी यांनी जवळ जवळ प्रत्येक वेळी मी विस्मित झालो आहे. सहकारी चळवळीची आणि विशेषत: सहकारी साखर कारखान्याची तालीम शाळा तयार झाली नसती तर मंत्रिपदाची धुरा सांभाळण्याच्या ताकदीची माणसे मिळणे ग्रामीण भागात कठीणच झाले असते. महाराष्ट्र राज्यात बाळासाहेब खेरांच्या मंत्रिमंडळापासून ते यशवंतराव चव्हाणांच्या मंत्रिमंडळापर्यंत जो काही फरक घडून येऊ शकला आणि ग्रामीण कर्तृत्वाला मुंबईदरबारी जे स्थान मिळाले त्याचे फार मोठे श्रेय साखर कारखान्यांमुळे मिळालेल्या अनुभवाला द्यावे लागेल.

सहकारी साखर कारखान्यांच्या उदयाबरोबर उसाखालील क्षेत्र वाढले, उसाचा विकास झाला, ऊस उत्पादकांना कर्जपुरवठ्याची सोयीस्कर व्यवस्था झाली याबद्दलही दुमत असण्याचे काही कारण नाही. कारखान्यांच्या परिसरांतील विकास, ऊस आणि साखर उत्पादनात वाढ आणि ग्रामीण भागांत नवीन राजकीय नेतृत्वाचा उदय याबद्दलचे श्रेय निश्चितपणे सहकारी साखर कानखान्यांना दिले पाहिजे.

पण यापलीकडे जाऊन सहकारी चळवळ म्हणजेच शेतकऱ्यांची चळवळ, शेतकऱ्यांना भाव मिळवून देण्यासाठी, त्यांचे दारिद्र्य हटविण्यासाठी हा एकमेव मार्ग आहे असे कुणी सांगू लागला तर मात्र त्याचे म्हणणे मान्य करणे कठीण होईल. सहकारी क्षेत्रांत कर्तबगारी दाखवून नंतर राज्याचे अनेक वेळा मुख्यमंत्री झालेले आणि राजस्थानच्या राज्यपालपदावरून नुकतेच निवृत्त झालेले वसंतदादा पाटील यांनी आयुष्यभर सहकाराचा हिरीरीने पुरस्कार केला आणि आजही करतात; पण तीन चार दशके सहकाराचे साधन कुशलतेने वापरणाऱ्या वसंतदादा पाटलांना उतरत्या वयात शेतकरी आंदोलनाची भाषा बोलावी लागली ही एकच गोष्ट पुष्कळ काही सांगून जाते. हे आंदोलन राज्यकर्त्या पक्षाच्या चौकटीत आणि पक्षश्रेष्ठींच्या आशीर्वादाने का चालायचे असेना पण शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाला आंदोलनाने तोंड द्यावे लागेल अशी स्पष्ट भाषा वसंतदादा वापरू लागले आहेत. सहकारी चळवळीने शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवायला काही मदत झाली नाही हा वसंतदादांसारख्या सहकारमहर्षींच्या आयुष्याचा निष्कर्ष आहे. वसंतदादांनी इतक्या वर्षांच्या सहकार कारकीर्दीनंतर आंदोलनाच्या रणभूमीवर उतरण्याची तयारी दाखवली; कारण त्यांची प्रकृती स्वातंत्र्यसैनिकाची आहे. बेचाळीसच्या चळवळीत गोळी झेलणाऱ्या दादांना आपण देवाच्या ऐवजी चोराच्या आळंदीला येऊन पोहोचलो हे समजण्याची जाणीव आणि कुवत आहे. सहकारी साखर कारखानदारीच्या इतर वस्तादांना अजून उपरती झाल्याची लक्षणं दिसत नाहीत.




मा. शरद जोशी यांचे हे दोन्ही लेख पूर्वप्रकाशित असून 'बळीचे राज्य येणार आहे' या ग्रंथातही समाविष्ट आहेत. सहकाराविषयीची एकूणच शरद जोशी यांनी पंचवीस वर्षांपूर्वी मांडलेली ही भूमिका राज्यकर्त्यांच्या शेतकरी विरोधी धोरणांना अधोरेखित करते.

‘ खरे म्हटले तर सहकार ही कोणताही व्यवसाय चालविण्याची एक पद्धती आहे. कोणताही धंदा चालवायचा असला तर तो एकट्याचा खाजगी धंदा म्हणून चालवता येतो, भागीदारीत चालवता येतो, मर्यादित जबाबदारीची खाजगी कंपनी काढून करता येतो किंवा व्यवसाय जास्त व्यापक स्वरुपाचा असेल तर आणि भांडवलाची गरज जास्त असेल तर मर्यादित जबाबदारीची सार्वजनिक कंपनीसुद्धा काढली जाते. अशा कंपन्यांच्या प्रमुखांना उद्योगमहर्षी वगैरेसुद्धा फारसे म्हटले जात नाही. त्या कारखानदाराच्या साठाव्या, सत्तराव्या वाढदिवशी एखादा वक्ता कदाचित अशी विशेषणे

सहकारी साखर कारखान्यांनी काय कामगिरी बजावली? या कारखान्यांच्या उभारणीसाठी आणि प्रशासनासाठी प्रचंड साधनसंपत्ती आणि मनुष्यसंपत्ती गुंतवली गेली त्यातून निष्पन्न काय झाले, त्यातून शेतकऱ्यांना काय मिळाले याचा वस्तुनिष्ठ ताळेबंद मांडणे आवश्यक आहे. एकोणीसशे एकाहत्तर साली महाराष्ट्रात दोन लक्ष सतरा हजार हेक्टर जमीन ऊस लागवडीखाली होती. १९८५ मध्ये हा आकडा दोन लक्ष त्र्याण्णव हजारपर्यंत गेला. म्हणजे पंधरा वर्षांच्या काळात झालेली वाढ केवळ पस्तीस टक्क्याची. उसाखालील क्षेत्र कारखान्यांच्या स्थापनेमुळे काही स्थिर झाले असेही चित्र दिसत नाही. एकोणीसशे ब्याऐंशी-त्र्याऐंशी मध्ये उसाखालील क्षेत्र तीन लक्ष सव्वीस हजारापर्यंत वाढले होते. त्याच्या आधी दहा वर्षे म्हणजे १९७२ मध्ये उसाखालील क्षेत्र एक लक्ष सेहेचाळीस हजारापर्यंत उतरले होते. म्हणजे सहकारी कारखान्यांमुळे महाराष्ट्र राज्यात तरी ऊसउत्पादन क्षेत्रात काही फार लक्षणीय वाढ झाली आहे किंवा ऊसउत्पादनात स्थिरता आली असे नाही.

याच काळात उसाचे उत्पादन एकशे अठ्ठेचाळीस लाख टनांवरून दोनशे सदतीस लाख टनांवर गेले म्हणजे उसाच्या उत्पादनात साठ टक्के वाढ झाली. प्रती हेक्टर उत्पादन १९७१ मध्ये अडुसष्ट क्विंटल होते. १९७१-८० या काळात उत्पादकता वाढवण्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न झाले आणि त्याला काही यशही मिळाले असे दिसते. याउलट गेल्या सात वर्षांत उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीने काही फार स्पृहणीय प्रगती झाली आहे असे नाही.

उसातील शर्करांशाची महाराष्ट्रातील सरासरी १९७१ मध्ये ११.२५ होता. १९६८ मध्ये तो ११.२०च होता. महाराष्ट्रातील उसातील शर्करांश इतर राज्यांच्या तुलनेने जास्त आहे ही गोष्ट खरी पण त्यात सहकारी साखर कारखानदारीच्या कर्तबगारीचा काही हिस्सा नाही. याउलट पंजाब राज्यात शर्कराशांची टक्केवारी ८.५७ पासून १०.६३ पर्यंत पोहोचली. उसाच्या पिकाबद्दल सहकारी कारखान्यांनी प्रचंड कामगिरी केल्याचा जो गवगवा आहे त्यात फारसे तथ्य नाही हा महत्त्वाचा मुद्दा.

कारखान्यांची कार्यक्षमताही या काळात वाढली असे म्हणायला काही जागा दिसत नाही. साखर कारखाने हंगामातच चालतात. १९७१ मध्ये महाराष्ट्रातील कारखाने सरासरीने एकशे चौसष्ट दिवस चालले. १९७८ मध्ये कारखान्यांच्या कामाचे दिवस एकशे पंच्याऐंशी पर्यंत वाढले आणि त्यानंतर १९८२ मध्ये कारखान्यांनी दोनशे तीन दिवस काम केले. पण मधल्या वर्षात कामाच्या दिवसांची संख्या एकशे नऊ पर्यंत घसरली. एकोणीसशे शहाांशी साली कामाच्या दिवसांची संख्या फक्त एकशे तेहतीस होती. कारखान्यात नोकरवर्गाची राजकीय किंवा वैयक्तिक कारणासाठी केलेली वारेमाप भरती, उधळमाधळ, चोऱ्या, भ्रष्टाचार आणि अकार्यक्षमता याबद्दल लिहिणे नकोच. महाराष्ट्रात पिकलेल्या उसाचे गळीत करण्याचे कामही सहकारी साखार कारखान्यांनी कार्यक्षमतेने पार पाडलेले नाही. याचा अर्थ असा की शासनाचे साखरविषयक धोरण अगदी शेतकऱ्यांना अनुकूल असते तरी सहकारी साखर काराने झाल्यामुळे शेतकऱ्यांना काही विशेष फायदा झाला असता असे नाही. खाजगी कारखान्यांनी कमी खर्चात गळीत केले असते आणि त्याचा फायदा कारखान्याच्या मालकांनी घशात टाकला असता. सहकारी साखर कारखान्यांनी अंदाधुंदीत हा फायदा शेतकऱ्याकडे आला असे नाही. चोराचिलटांनी तो ओरबाडून नेला.

पण सहकारी सहकारी साखर कारखान्यांच्या चळवळीची खरी शोकांतिका यापुढेच आहे. शासन शेतकऱ्यांच्या बाजूने असते तरी सहकारी कारखान्यांनी शेतकऱ्यांच्या भल्याची कामगिरी बजावली असती असे नाही; पण शासकीय धोरण शेतकऱ्यांविरूद्ध जाऊ लागले तर शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्याची कामगिरी सहकारी साखर कारखान्यांच्या बड्या पुढाऱ्यांची होती. सहकारी साखर कारखान्यांच्या पूर्ण इतिहासात शासनाचे धोरण शेतकरी हिताच्या विरोधी होते. एवढेच नव्हे तर ते शेतकरीद्वेष्टे होते. उसाचे उत्पादन तर वाढावे, साखरेचे उत्पादनही त्याबरोबर वाढावे; परंतु शेतकऱ्यांचा उत्पादनखर्च भरून येईल इतकी किंमत तर

वापरतो; पण ती कुणी फारशी गंभीरपणे घेत नाही आणि अमुक अमुक कारखानदार 'प्रायव्हेट लिमिटेड महर्षी' आहे किंवा 'पब्लिक लिमिटेड सम्राट' आहे अशीही भाषा कधी ऐकू येत नाही.

'सहकारी चळवळ' हा शब्दप्रयोगही असाच गमतीचा आहे. औद्योगिकीकरणाची चळवळ असू शकते, व्यापार वाढविण्याची चळवळ होऊ शकते; पण पब्लिक लिमिटेड कंपन्यांची चळवळ किंवा प्रायव्हेट लिमिटेड कंपन्यांची चळवळ असली भाषा कधी ऐकू येत नाही. या संस्थांप्रमाणेच एक संस्था जी सहकारी संस्था तिच्या नावाचे मात्र चळवळीचे बारसे होते.

या सहकारी संस्थांचे आणखी एक वैशिष्ट्य. शहरांमध्ये सहकारी संस्था नसतात असे नाही, काही किरकोळ बँका, काही ग्राहक सेवा संघ आणि प्रामुख्याने गृहनिर्माण संस्था सोडल्या तर शहरातील आर्थिक उलाढाली प्रामुख्याने खाजगी आणि सार्वजनिक कंपन्या चालवतात. धंदा छोटा असला तर तो खाजगीत किंवा भागीदारीत चालवतात; पण शहरी व्यवस्थेत सहकाराला स्थान कमीच.

याउलट ग्रामीण भागांतील जवळजवळ सर्व आर्थिक व्यवसाय हे सहकाराशी कोठेतरी जोडले गेले आहेत. गावांतील विविध सेवा सहकारी संस्था असो, खरेदी-विक्री संघ असो, कृषी उत्पन्न बाजार समिती असो, भूविकास बँक असो का दूध, हातमाग, साखर यासारख्या वस्तूंच्या उलाढाली करणाऱ्या संस्था असोत. गावागावातील किरकोळ वाणी आणि बलुतेदारांचे खाजगी व्यवसाय सोडले तर सगळीकडे सहकाराच्याच पाट्या दिसतात. थोडक्यात इंडियाचे व्यवहार सगळे कंपन्यांचे; पण भारतातील व्यवहार तेवढे सहकारी अशी फाळणी दिसते.

मिळू नये यासाठी शासनाने मोठ्या क्रूरपणे एक षड्यंत्र रचले. शेतीमालाला भाव मिळू नये म्हणून शासन गहू, कापूस, दूध, तेलबिया आणि डाळी या मालांच्या बाबतीत कसोशीने प्रयत्न करते पण उसाला भाव मिळू नये म्हणून शासनाने जो काही खटाटोप केला त्याची सर दुसऱ्या कोणत्याच क्षेत्राला नाही.

उसाची किमान किंमत अगदी अपुऱ्या पातळीवर ठरवणे, वाहतुकीसारख्या महत्त्वाच्या खर्चाकडे डोळेझाक करणे हे ऊसउत्पादकाविरुद्ध शासनाचे वापरलेले प्रमुख हत्यार. गळिताचा खर्चही शासन अपुऱ्या पातळीवरच ठरवते; पण त्याचा तोटा कारखान्यावर काम करणाऱ्या नोकरवर्गावर होत नाही, त्यांचा पगार-भत्ते द्यावेच लागतात. मग तो बोजा बसतो शेतकऱ्यांच्या बोकांडी. उसाची किमान किंमत आणि गळिताचा खर्च दोन्ही अपुरे धरले म्हणजे साखरेची किंमत आपोआपच अपुरी ठरते. या असल्या अपुऱ्या किंमतीत कारखान्यात तयार झालेली साखर जबरदस्तीने लेव्ही म्हणून घेऊन जायची. साखर खपत नसली तर सरकार लेव्ही घ्यायला येणार नाही. साखरेचा तुटवडा असला तर सरकार लेव्ही तर घेणारच; पण वर उधारही साखर घेऊन जाणार. देशात सगळ्या शेतीमालाच्या किंमती एकठोक ठरतात. गहू पंजाबचा असो की महाराष्ट्राचा किंमत एकच. महाराष्ट्रात पिकणाऱ्या कोरडवाहू कापसाचा उत्पादन खर्च इतर राज्यांच्या तूलनेने खूपच जास्त आहे. पण महाराष्ट्राच्या कापसाला काही मदत म्हणून जास्त किंमत मिळत नाही. पण महाराष्ट्र उसाच्या उत्पादनात जरा वरचढ आहे. त्याबद्दल महाराष्ट्राला शिक्षा होते आणि महाराष्ट्रात साखरेची लेव्ही किंमत सगळ्यात कमी ठेवली जाते. लेव्ही देऊन उरलेली साखर खुल्या बाजारात विकायची परवानगी आहे खरी पण ती प्रत्येक महिन्यात किती विकायची हे ठरवायचे सरकारने. ठरवलेल्या आकड्यापेक्षा साखर कमी विकली तर शिक्षा. जास्त विकली तरी शिक्षा. इतक्या जबरदस्त बंधनात सर्व साखर कारखाने जखडलेले आहेत. एवढ्याने भागत नाही म्हणून की काय साखरेचे आयात -निर्यात धोरण असे राबवले जाते ज्यामुळे साखरेचे आणि परिणामतः उसाचे भाव पडावेत. पण या सगळ्या अन्यायांविरूद्ध दंड ठोकून उठणारा एकसुद्धा 'मायेचा पूत' सहकारी चळवळीने दिला नाही. सहकारी तत्त्वाच्या आत्म्याला संपवणारा उसावरील खरेदीकर सरकारने लादला आणि वसूल केला; पण त्याविरुद्ध तोंडातून कुणी ब्रसुद्धा काढला नाही. उसाचे कारखाने केवळ राजकीय कारणासाठीच स्थापन करण्यात आले. अकार्यक्षम कारखान्यांना जगवण्याकरिता शासनाने झोन व्यवस्था काढली. नगद रकमेत उसाची किंमत किती द्यायची यावर कमाल मर्यादा घातली. बिगरपरतीच्या ठेवीसारख्या विलक्षण योजना उपजल्या त्यांच्या विरूद्ध बोलण्याचे तर कोणत्याही साखरसम्राटाला काही कारण नव्हते! मग कोण्या निधीकरीता, मुख्यमंत्र्यांकरिता, पंतप्रधान निधीकरिता पैसे किती कापून नेले तर त्याचा जाब कोण विचारणार? साखरेवर मिळणारा 'ऑनमनी', मद्यार्कावर मिळणारा प्रचंड छुपा पैसा आणि झोनच्या व्यवस्थेमुळे बिगरसदस्यांच्या उसावर सुटणारा पैसा याच गोष्टींवर सगळ्यांचे लक्ष, याच विषयावर सगळी चर्चा. ऊसउत्पादक शेतकऱ्याला लागलेल्या हृदयरोगाकडे लक्ष द्यायला वेळ कुणालाच नाही. सहकारी साखर कारखान्यांनी भले मोठे पुढारी निपजवले, पण त्यांच्यापैकी शेतकऱ्यांच्या मदतीला कुणीच उतरला नाही.

सहकारी साखर चळवळीची ही शोकांतिका बारकाव्याने समजून घेणे आवश्यक आहे. त्याशिवाय सहकारी साखर कारखान्यांच्या कर्तृत्वांचा पडदा दूर होणार नाही.

*(पूर्वप्रसिद्धी : क्रमशः साप्ताहिक ग्यानबा, नोव्हेंबर १९८७ ते फेब्रुवारी १९८८)*

## निर्बंधमुक्त साखर आणि निर्बंधभक्त साखरसम्राट

शाळा-कॉलेजातील विद्यार्थ्यांना जशी वार्षिक परीक्षा तशीच वित्तमंत्र्यांना अंदाजपत्रकाच्या दिवसाची कसोटी. अंदाजपत्रक प्रतिनिधीसभेला सादर करताना वित्तमंत्र्यांकडे दोन तास, दूरदर्शनच्या माध्यमाने, साऱ्या राष्ट्राचे लक्ष

लागून राहते. आपल्या अंदाजपत्रकी भाषणात वित्तमंत्र्यांना अनेक करामती करून दाखवाव्या लागतात. गेल्या आर्थिक वर्षात एखादी अपवादात्मक सुलक्षणी गोष्ट घडली असेल तिचा नगरा पिटणे, बहुतांश विपरीत घटनांवर जमेल तितके पांघरूण घालणे, पंतप्रधानांची शक्य तितकी चापलुसी करणे, आपला अर्थशास्त्रातला असलेला किंवा नसलेला अधिकार दाखविणे, कुवतीप्रमाणे संस्कृत वाङ्मयाचे किंवा निदान बाजारी शेरोशायरीचे प्रदर्शन करणे इत्यादी इत्यादी अनेक करामती वित्तमंत्र्यांना करून दाखवाव्या लागतात. यात कोठेही उणे पडले तर त्यांची सारी राजकीय कारकीर्द धोक्यात येण्याची शक्यता असते. या एका दिवसातील दोन तासांच्या करामतीवर त्यांचे सारे भविष्य टांगून असते.

वार्षिक परीक्षेचे महत्त्व अगदी उनाड विद्यार्थ्यांनासुद्धा वर्षाच्या सुरुवातीपासूनच पक्के माहीत असते - एके दिवशी वार्षिक परीक्षेला सामोरे जावे लागणार आहे हे त्यांना पक्के माहीत असते. एक दिवस यमाच्या दरबारात झाडा द्यावा लागणार आहे अशी श्रद्धा असलेले पापभीरू भाविकसुद्धा जीवात जीव असेपर्यंत पुण्याचा रस्ता सोडून भलत्याच रस्त्याला लागतात, तसेच या विद्यार्थ्यांनाही जवळच्या चित्रपटगृहात खेळ, नाटकाचे प्रयोग, सहली, वेगवेगळ्या निवडणुका आणि 'डेज' यांचा मोह काही टाळता येत नाही. परीक्षेला अजून वेळ आहे असे मनाचे समाधान करीत उनाड विद्यार्थी अभ्यास बाजूला ठेवून सारे काही कार्यक्रम यथासांग पार पाडतात. परीक्षा महिन्या दोन महिन्यांवर आली की मग मात्र परीक्षेच्या तयारीसाठी घोकंपट्टीला सुरुवात करतात. वर्षभर अभ्यास केला नाही तरी शेवटच्या महिन्यातील धडपडीने अपेक्षित प्रश्नांसाठी तयारी करून परीक्षेच्या दिव्यातून आपण पार पडून जावे, निदान एटीकेटी मिळवावी अशी त्यांची खटपट चालू होते.

अर्थव्यवस्थेचा कारभार सुव्यवस्थित चालावा यासाठी वर्षभर सातत्याने परिश्रम केले तर वित्तमंत्र्यांनादेखील अंदाजपत्रकाच्या उंबरठ्यावर धावपळ करण्याची गरज पडू नये; पण असे होत नाही. साऱ्या मंत्रिमंडळात परराष्ट्र, गृह या खात्यांच्या बरोबरीने वित्तखात्याचे महत्त्व असते. वित्तमंत्र्यांना लक्ष घालावे लागणार नाही अशी कोणतीच महत्त्वाची घटना नसते. साहजिकच, वर्षभर विविध कामांच्या व्यापात वित्तमंत्री अडकून जातात.

साधारण फेब्रुवारी महिन्याच्या सुरुवातीला त्यांना खडबडून जाग येते. २६ तारखेला अंदाजपत्रक सादर करायचे आहे. मग ते झपाट्याने तयारीला लागतात. गेल्या वर्षीच्या अंदाजपत्रकात मांडलेले खर्चाचे आणि उत्पन्नाचे अंदाज कितपत प्रत्यक्षात उतरले आणि किती चुकले हा महत्त्वाचा मुद्दा; पण त्यावर देखरेख प्रशासन व्यवस्था ठेवत असते. कोणत्याही क्षणी अद्ययावत् आकडेवारी उपलब्ध होते. अपेक्षेपेक्षा उत्पन्न कमी असल्यास संबंधित खात्यांची शेपटी पिरगाळली जाते. खर्चापोटी झालेल्या तरतुदींप्रमाणे कार्यक्रम पार पडले नसतील तर उरलेल्या दिवसांत शक्य तितका खर्चाचा झपाटा लावावा लागतो.

आय-व्ययाचे अंदाज चुकले तर ती काही फारशी गंभीर गोष्ट नाही. हे अंदाज चुकतच असतात. त्याबद्दल सारवासारव करणे फारसे कठीण नसते. याउलट, गतवर्षीच्या अंदाजपत्रकात काही विवक्षित आश्वासने दिलेली असतील आणि त्याविषयी काही प्रगती झाली नसेल तर त्यावर मात्र संसदेत गदारोळ उठू शकतो. फेब्रुवारी महिन्याच्या सुरुवातीच्या सुमारास वित्तमंत्री गेल्या वर्षी दिलेल्या आश्वासनांच्या तपासणीस लागतात. यंदाच्या वर्षी वित्तमंत्री यशवंत सिन्हा यांना ही जाग फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात आली असावी.

गेल्या वर्षीच्या अंदाजपत्रकी भाषणात त्यांनी जाहीर केले होते, ''शेतीमालाची वाहतूक, साठवणूक व व्यापार यांवरील बंधनांमुळे शेतकरी अडचणीत सापडतो. .....जीवनावश्यक वस्तूंच्या कायद्याच्या तरतुदी रद्द करण्यात येतील.'' या अर्थाची दवंडी वर्षानुवर्षे वित्तमंत्री पिटत असतात; पण जीवनाश्यक वस्तूंच्या कायद्याच्या तरतुदी रद्द करणे ऐऱ्यागैऱ्याचे काम नाही! दुसऱ्या महायुद्धाच्या काळापासून या कायद्याच्या तरतुदींचा वापर करून शेतकरी, इतर उत्पादक आणि व्यापारी यांच्या मागे ससेमिरा लावून स्वत:चे उखळ पांढरे करणाऱ्यांची एक जबरदस्त फळी तयार झाली आहे. एक वेळ काश्मीरच्या प्रश्नावर पुढारी तडजोड करण्यास तयार होतील; पण जीवनावश्यक वस्तूंच्या कायद्यात मात्र काहीही बदल सहन करणार नाहीत. वित्तमंत्र्यांनी या विषयावर वेगवेगळ्या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची एक परिषद बोलावली होती. नागरी पुरवठामंत्र्यांनी केंद्र शासनाची सारी जबाबदारी राज्यांवर ढकलण्याचा प्रयत्न केला होता. आधीच आर्थिक तंगीच्या कात्रीत सापडलेल्या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी पाचव्या वेतन आयोगाच्या दुधाने तोंड पोळल्यानंतर जीवनावश्यक वस्तूंचा कायदा रद्द करण्याच्या ताकाकडे संशयाने पाहिले. म्हणजे मोठी पंचाईतच झाली! आता संसदेसमोर काही देखावा तर केला पाहिजे! मोठ्या तातडीने मंत्रिमंडळाची संमती घेऊन एक घोषणा करण्यात आली.

गहू आणि तज्जन्य पदार्थ, तसेच भरड धान्ये, डाळी आणि लोणी या पदार्थांच्या निर्यातीवरील बंधने हटवण्यात आली. कांद्याच्या निर्यातीसंबंधी कोटाव्यवस्था चालूच राहणार आहे; पण दरवर्षी ७ लाख टन निर्यातीची शाश्वती देण्यात आली आहे. जगाच्या बाजारात, बंधनमुक्त केलेल्या मालाला आज फारसा वाव नसल्याने या घोषणेत फारसा काही तथ्यांश नाही. जीवनावश्यक वस्तूंच्या कायद्याच्या जबड्यातून एक डझनभर वस्तू वगळण्यात आल्या आहेत. सिमेंट, कापड गिरणीची यंत्रसामग्री, रेशमी कापड, राजीवस्त्रे, लोकरी कापड, धागे इत्यादी इत्यादी. यांत कोणत्याच शेतीमालाचा समावेश नाही.

शेतीमालावरील निर्बंध उठविण्याच्या दृष्टीने एकच महत्त्वाचे पाऊल जाहीर करण्यात आले. साखरेवरील सक्तीची वसुली म्हणजे कुप्रख्यात 'लेव्ही' रद्द करण्यात येणार आहे. त्यासाठी काही पूर्वअटी ठरवण्यात आल्या आहेत. त्या अटींचे स्वरूप असे आहे की त्या नजीकच्या काळात पूर्ण होण्याची शक्यता नाही. तरीदेखील, साखरेवरील सक्तीची वसुली रद्द करण्याच्या घोषणेने साऱ्या साखरसम्राटांच्या महालांत मोठी घबराट उडून गेली आहे. भवानीनगर कारखान्याचे अध्यक्ष श्री. जाचक यांनी उघडपणे लेव्ही संपण्याच्या घोषणेचे स्वागत केले आहे. आणखी दोन-चार कारखान्यांचे अध्यक्ष मनातून स्वागत करीत असतील; पण ते जाहीर करण्याची हिम्मत दाखवू शकत नसतील. एरवी, महाराष्ट्र राज्यात या निर्णयावरील प्रतिक्रिया विशेष तीव्र आहे. 'शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करणारा सहकारविरोधी निर्णय', 'ऊसउत्पादकांना संकटात आणणारा निर्णय', 'सहकारी साखरउद्योग मोडीत काढणारा निर्णय', 'सहकारी साखर कारखानदारी विनाशाच्या उंबरठ्यावर' अशा प्रतिक्रिया साखरसम्राटांनी दिल्या आहेत.

रेशन दुकानात कार्डावर स्वस्त भावाने साखर देता यावी यासाठी प्रत्येक कारखान्याच्या उत्पादनापैकी काही भाग सरकार खुल्या बाजारापेक्षा कमी भावाने सक्तीने वसूल करते. उत्पादन हंगामात होते, वाटप वर्षभर होते; त्यामुळे, कारखान्यांना लेव्हीचा साठा सांभाळून ठेवावा लागतो. त्यामुळे अडकलेल्या रकमेवरचे व्याज बुडते. १९८० मध्ये शेतकरी संघटनेने उसासंबंधी आंदोलन केले त्यावेळी साखरेच्या एकूण उत्पादनाच्या ६५ टक्के भाग सरकार सक्तीने वसूल करीत असे. या टक्केवारीत क्रमाक्रमाने बदल होत ती सध्या फक्त पंधरावर ठेवण्यात आली आहे. उरलेली सर्व साखर म्हणजे ८५ टक्के उत्पादन बंधनमुक्त

समजले जात असले तरी प्रत्यक्षात त्याची विल्हेवाट दिल्लीहून जाहीर करण्यात येणाऱ्या मासिक आदेशाप्रमाणेच करावी लागते. अलीकडे या पद्धतीत थोडा बदल करून आदेश दरमहा निघण्याऐवजी तीन महिन्यांतून एकदा काढण्याची सुरुवात झाली आहे.

सध्या बहुतेक साखर कारखान्यांकडे साखरेचे प्रचंड साठे पडून आहेत. गेल्या काही काळात पाकिस्तानमधून साखरेची जी भरमसाट आयात करण्यात आली त्यामुळे साखरेचे पडून राहिलेले साठे अधिकच वाढले आहेत. गहू साठवण्यास गोदामे नाहीत अशी परिस्थिती देशात तयार झाली त्यासंबंधी बराच गाजावाजा झाला; पण प्रत्येक कारखान्यात साध्या ताडपत्रीच्या आडोशाने हजारो टन साखर पडून आहे याबद्दल फारसा गवगवा होत नाही. किरकोळ बाजारात साखरेचा भाव १३ रु. किलोवर गेला आहे आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत साखरेचे भाव घसरत आहेत. त्यामुळे भारताची साखर निर्यात होण्याची फारशी शक्यता नाही.

साखरसाठ्यांची अशी लयलूट असताना नेमके लेव्हीचा जाच दूर करण्याला मुहूर्त सापडावा यामागे मोठे रहस्य आहे. जनता दलाच्या काळात चौधरी चरणसिंग, शेतकऱ्यांचे तथाकथित मसीहा, सत्तेवर असताना साखरेचे साठे असेच मुबलक झाले होते. आपण शेतकऱ्यांचे मोठे हित साधित आहोत असा देखावा करून चौधरीजींनी साखरेवरील लेव्ही रद्द केली; खुल्या बाजारातील साखरेचे भाव घसरले, शहरी ग्रहकांना आम्ही साखर स्वस्त करून दिली म्हणून समाजवादी थयथया नाचले. शेतकऱ्यांवर उसाची उभी पिके जाळून टाकण्याची वेळ आली. ऊसउत्पादकांच्या असंतोषाचा वणवा भडकू लागला तसे चौधरींनी काढता पाय घेतला आणि लेव्ही व्यवस्था पुन्हा अमलात आणली.

जनता दलाच्या आमदानीत झालेल्या चुकीची पुनरावृत्ती प्रशासन का करत आहे?

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कापसाचे भाव चढे असताना महाराष्ट्रातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना एकाधिकाराच्या दंडबेड्यांत जखडून ठेवणारे सरकार आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मंदी येताच काढता पाय का घेते?

समाजवादाच्या नावाखाली वर्षानुवर्षे चाललेल्या पद्धती जास्त शिस्तीने आणि सोयीस्करपणे विसर्जित करता येणार नाहीत काय?

जागतिक बाजारात तेजी आली आणि कापूस उत्पादनाच्या तंत्रज्ञानावरील सर्व बंधने दूर झाली म्हणजे सावचित्तपणे सरकारी खरेदीला समांतर खाजगी खरेदीला वाढता वाव देऊन कापूस एकाधिकाराने यथासांग विसर्जन शक्य आहे. त्याप्रमाणेच, समाजवादाच्या काळात सहकार व्यवस्था आणि साखर उद्योग पोखरून टाकणारी जी व्यवस्था होती ती दूर करून आणि सध्या उद्योगाच्या उरावर साठलेल्या साखरेच्या पोत्यांच्या थप्पी दूर करून लेव्ही रद्द करण्याचे पाऊल उचलता आले असते.

महाराष्ट्रातील सहकार महर्षींनी लेव्ही रद्द करण्याच्या पद्धतीबद्दल वा प्रक्रियेबद्दल टीका केलेली नाही; त्यांचा विरोध लेव्ही रद्द करण्याच्या कल्पनेलाच आहे. कोणी एक उत्पादक कारखानदार त्याच्या उत्पादनापैकी एक सज्जड भाग सरकारने सक्तीने वसूल करून घेऊन जावा असा आग्रह धरतो हे दृश्यच मोठे विचित्र आहे. लेव्ही साखरेचे भाव इतर मालांच्या आधारभूत किमतींप्रमाणे सर्व देशभर एकसारखे नसतात. महाराष्ट्र, गुजरात, तामिळनाडू यांसारख्या राज्यांत, जेथे एकरी उत्पादन व शर्करांश अधिक आहे तेथे, लेव्हीची किमत कमी असते. बिहार, ओरिसासारख्या राज्यांत, जेथे एकरी उत्पादन व शर्करांश कमी तेथे, अधिक किंमत देण्याची, राजकारणी पुढाऱ्यांच्या सोयीची पद्धत आहे. बिहार, ओरिसासारख्या, उसाचे दरिद्री पीक घेणाऱ्या राज्यांत लेव्ही उठवण्याविरुद्ध गदारोळ उठला असता तर ते समजण्यासारखे होते. लेव्हीचा सर्वात कमी भाव मिळणाऱ्या महाराष्ट्रातील साखरसम्राटांनी 'आमच्या हातापायांतल्या दंड-बेड्या काढा होऽ' असा गळा काढावा यात महाराष्ट्रातील सहकारी कारखानदारीचे शेतकरीद्वेष्टे स्वरूप स्पष्ट होते.

चीन देशात पूर्वापारपासून मुलींचे पाय लहान असणे हे सौंदर्याचे लक्षण मानले जाई. त्यासाठी जन्मापासूनच त्यांचे पाय घट्ट बांधून ठेवीत. कम्युनिस्ट क्रांतीनंतर या दुष्ट पद्धतीवर बंदी घालण्यात आली. ज्यांचे पाय पूर्वी बांधलेले होते तेही मोकळे करण्याचे हुकूम सुटले. 'पट्ट्या काढल्यानंतर पायात रक्त वाहू लागले, त्याच्या असह्य वेदना सोसवेनात म्हणून आमचे पाय बांधलेलेच ठेवा' अशी हाकाटी त्या मुलींच्या वतीने करण्यात आली. महाराष्ट्रातील साखर कारखानदार 'लेव्हीचे बंधन चालू ठेवा' अशी जी हाकाटी करतात त्यामागेही, असाच, दूरवरच्या कल्याणाचा विचार नाही.

महाराष्ट्रातील साखर कारखानदारी ही पूर्णतः राजकीय खेळी आहे. कोटी दोन कोटी रुपयांचे भांडवल शेतकऱ्यांकडून जमा करण्याचे कसब असलेला कोणीही पुढारी सरकारदरबारी असलेले वजन वापरून कारखान्याचा परवाना मिळवू शकतो. त्यामुळे नव्वद-शंभर कोटी रुपये खेळायला मिळू शकतात. अशा सहकारी कारखानदारीमुळे तंत्रज्ञान जुनेबुरसेच वापरले जाते; बाजारपेठ मिळण्याचा विचारही सहकारमहर्षींना वमनप्राय वाटतो! ठराविक प्रकारची साखर सरकारी मदतीने बाजारात खपवण्याच्या व्यवस्थेच्या ते आधीन झाले आहेत. महाराष्ट्रातील सहकाराला स्पर्धेचे वावडे आहे. यामुळे सारे साखरसम्राट एकसुरात कोल्हेकुई करीत आहेत.

चौधरी चरणसिंगांच्या काळात शासनाने लेव्ही उठवण्याआधी अडीअडचणीच्या प्रसंगी उपयोगी पडण्यासाठी पर्याप्त साठा करून ठेवला पाहिजे होता अशी एक विधायक सूचना करण्यात आली होती. कोणाही साखर कारखानदाराने 'शासनाने कारखान्या-कारखान्यांत साठलेल्या साखरेच्या पोत्यांचा निचरा करावा' अशी मागणी केलेली नाही. याचा अर्थ, 'सक्तीच्या वसुलीच्या बेड्यांखेरीज आम्ही चालू शकत नाही' असा हा कबुलीजबाब आहे. लेव्हीची व्यवस्था शेतकऱ्यांना विषाप्रमाणे वाटते आणि कारखानदारांना ती अमृतवल्ली वाटते. यापेक्षा अधिक विदारक चित्र असूच शकत नाही.

साखर कारखानदारांच्या आक्रोशात आणखी एक मोठी, म्हटले तर गमतीची म्हटले तर विचित्र गोष्ट आहे. वर म्हटल्याप्रमाणे लेव्ही पद्धत रद्द करण्यासाठी सरकारने काही अट घातली आहे. अलीकडेच सरकारने साखरेचा वायदेबाजार चालू करण्यासाठी तीन परवाने दिले आहेत. या परवान्यांनुसार साखरेचा वायदेबाजार ठाकठीक काम करू लागला म्हणजे नंतरच लेव्हीची वसुली बंद व्हायची आहे. या पूर्वअटीबद्दल कोणी कारखानदाराने शब्दही काढलेला नाही. वायदेबाजार हे काय प्रकरण आहे हे त्यांना माहीत नाही असे म्हणणे कठीण आहे. वायदेबाजार म्हणजे ऐतखाऊ सटोडियांना 'दिया, लिया करून गडगंज नफा मिळविण्याची व्यवस्था' अशी कल्पना समाजवादाच्या काळात रूढ झाली होती. त्यामुळे कदाचित, सरकारने वायदेबाजार कार्यक्षमपणे चालण्याच्या घातलेल्या अटीकडे कारखानदार दुर्लक्ष करीत असतील.

(पूर्वप्रसिद्धी : शेतकरी संघटक, २००२)

sharadjoshi.mah@gmail.com

■■

# निवडणुका
## मागचे पाढे पंचावन्न

नेमके कापूस पट्ट्यातच शेतकऱ्यांच्या आत्महत्या दरवर्षी वाढत आहेत. या कापूस शेतकऱ्यांसाठी पंतप्रधानांचे, मुख्यमंत्र्यांचे पॅकेज घोषीत झाले. ते त्यांच्यापर्यंत पोहोचलेच नाहीत. कापसावर काही कायमस्वरूपी विलाज व्हावा यासाठी कापूस पट्ट्यातच सुतगिरण्या उभारण्याची शिफारस करण्यात आली. या सूतगिरण्या आणि जिनिंग नेमक्या राजकारणी लोकांच्या हातातच पडतात. शेतकऱ्यांना त्यांचा कधीच फायदा झाला नाही. साखर उद्योग ज्या प्रमाणे नियंत्रणमुक्त करण्याचा विचार होतो आहे, तसाच विचार आता कापसासाठीही केला जाणार आहे का, असा प्रश्न आपण विचारला का?



ज्ञानेश्वर शेलार

ग्रामीण भागाच्या दृष्टीने व शेतकऱ्यांसाठी पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अत्यंत महत्त्वाच्या आहेत. या निवडणुकांमध्ये ग्रामीण भागाचे व शेतकऱ्यांचे प्रश्न अग्रक्रमाने चर्चिले गेले पाहिजेत यासाठीच ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद अशी पंचायत राजची त्रिस्तरीय रचना करण्यात आली आहे. गावाच्या विकासासाठी ग्रामपंचायत तालुका स्तरावरील सर्व विकासकामांसाठी पंचायत समिती व जिल्हास्तरावर सर्व विकासकामांसाठी जिल्हा परिषद अशी ही रचना आहे. जिल्हा परिषदेला तर जिल्ह्याचे मंत्रालयच समजले जाते. ग्रामीण भागातील सर्व योजना ह्या जिल्हा परिषदेमार्फतच राबविल्या जातात. यातील पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या निवडणुका सात फेब्रुवारी रोजी होत आहेत. हा अंक वाचकांच्या हाती पडेपर्यंत निवडणुकांचे मतदान होऊन गेलेले असेल. त्यानंतर अशा विषयांचा उहापोह करणे कितपत योग्य आहे, असा प्रश्नही काहींना पडू शकतो. एखादे मोठे काम झाल्यानंतर त्याच्याविषयी टीका टिप्पणी करणे योग्य आहे का? असे वाटणेही शक्य आहे. आपण मागील पाच वर्षे काय केले? आणि पुढील पाच वर्षे काय करणार? याचा थोडा तरी ताळेबंद व्यक्तिगत स्वरूपात मांडावा, हा खरा या लेखाचा हेतू आहे. लेखात चर्चिले जाणारे विषय आणि प्रश्न हे ग्रामीण भागातील प्रत्येकानेच स्वत:ला विचारून पाहावेत आणि स्वत:चेही परीक्षण करावे. पुढील पाच वर्षे कशी असतील याचा नेमका अंदाज त्यातून येण शक्य होईल.

ग्रामीण भागाशी आणि शेतीशी संबंधित निवडणुका असल्याने या निवडणुकांमध्ये शेतीमालाच्या भावाचा प्रश्न चर्चिला गेला का? हा खरा प्रश्न आहे. पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेसाठी उभे असलेले उमेदवार हे काही राज्याचे किंवा केंद्राचे धोरण ठरवणार नाहीत. मग हा प्रश्न किती संयुक्तिक आहे असे वाटणे साहजिक आहे. या निवडणुका तळागाळातील असल्या तरी यासाठी लढणारे पक्ष हे राज्य पातळीवरील किंवा देश पातळीवरील आहेत. पक्षीय ध्रुवीकरणामध्ये शिवसेना मनसे हे राज्यपातळीवरील पक्ष आहेत, तर भाजप, कॉंग्रेस हे देशपातळीवरील आहेत. राष्ट्रवादी खरा महाराष्ट्रापुरता तरीही केंद्रामध्ये समावेश असलेला पक्ष आहे. या पक्षांचेच गावपातळीवरील पुढारी पंचायत समिती आणि जिल्हा परिषद लढवित आहेत. त्यामुळेच या गावपातळीवर व जिल्हा पातळीवरही राज्याचे आणि केंद्राचे प्रश्न उपस्थित करणे संयुक्तिक आहे.

सध्या ऊस, कापूस, कांदा, हळद, यांचा प्रश्न राज्यभर आणि काही दिवसांत देशभरही गाजणार आहे. नुकतीच साखर उद्योग नियंत्रण मुक्त होणार असल्याची बातमी आली आहे. पंतप्रधानांनी यासाठी सी. रंगराजन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली आहे. ही समिती साखर उद्योगांचा अभ्यास करून त्यावर आपला अहवाल केंद्राला सादर करणार आहे. यात दोन महत्त्वाच्या गोष्टी घडल्या आहेत. या समितीवर कोणीही शेतकऱ्यांचे किंवा शेतकरी संघटनेचे प्रतिनिधी नाहीत. अहवाल सादर करण्याला कोणतीही कालमर्यादा नाही. सरकारला केवळ आपण काहीतरी करतो आहोत, हे दाखवायचे आहे, असा स्पष्ट हेतू यातून दिसतो. शेतकरी संघटनेने १९८० सालापासून साखर उद्योग नियंत्रणमुक्त करावा, अशी मागणी करून तीव्र आंदोलने केली आहेत. शेतकरी संघटनेच्या दबावामुळे सहकारमहर्षींना स्वत:चे आणि नातेवाईकांचे पोटभरून ऊस उत्पादकांना किफायतशीर किंमत देणेही भाग पाडले जात आहे. नव्हे त्यांना ती द्यावीच लागेल. नसता पुन्हा शेतकऱ्यांच्या तीव्र रोषाला सामोरे जावे लागेल. याचा परिणाम म्हणून आता सहकार महर्षीच आम्हाला मुक्त करा असे म्हणू लागले आहेत. निदान जे पैसे साखर विकून येतील, तो भाव आम्ही शेतकऱ्यांना देऊ त्यासाठी लेव्ही, हवाई अंतराचे बंधन, निर्यात कोटा इत्यादी बंधने हटवावी लागणार आहेत. संघटनेच्या याच मागण्या गेल्या २० ते २५ वर्षांपासून आहेत. इतके दिवस या मागण्यांना बगल दिली, तरी आता उसाच्या भावाचा प्रश्न दर हंगामात उपस्थित होत असल्याने वेगवेगळ्या मार्गाने सहकार महर्षीचे नाक दाबले की त्याचा परिणाम राज्य आणि केंद्र शासनावरती होतोच. आता सहकार महर्षींना मुक्तता हवी, अशावेळी निदान ऊस उत्पादक पट्ट्यात तरी सहकाराच्या आधाराने मोठ्या झालेल्या धेंडांना आणि त्यांच्या आश्रयाने पंचायत समिती, जिल्हा परिषद, निवडणुका लढविणाऱ्या पिलावळीला किंवा त्यांच्या मुलाला, पुतण्याला, सुनेला शेतकरी उमेदवार जेव्हा गावागावात प्रचारासाठी येणार आहेत तेव्हा 'आमच्या उसाचं काय? भाव किती देणार? बंद पडलेले कारखाने केव्हा चालू करणार? शेतातल्या उभ्या उसाचे काय करणार?' असे प्रश्न शेतकऱ्यांनी विचारले का?

इंधनाची मोठी टंचाई आणि त्यामुळे भाववाढ हा देशापुढचा ज्वलंत प्रश्न आहे. अशावेळी इथेनॉलसारखे जैवइंधन पेट्रोल आणि डिझेलमध्ये ५% मिसळण्यास परवानगी मिळावी, यासाठी गेली

१० वर्षे शेतकरी संघटना मागणी करीत आहे. यावर वारंवार चर्चा झडतात. तरीही अद्याप परवानगी मात्र मिळालेली नाही. इथेनॉलला परवानगी मिळाल्यास उसाच्या भावातही वाढ होणार आहे. असे असताना शेतकरी आता आम्ही इंधनाचे उत्पादक आहोत. बाहेरच्या देशांतून डिझेल पेट्रोल आयात करून दरवर्षी १ लाख २० हजार कोटी परकीय चलन खर्ची पाडले जाते. आमच्यासारख्या देशभक्तांना निदान त्यातला ५% खारीचा वाटा तरी उचलू द्या, असा प्रश्न शेतकऱ्यांनी विचारला का?

सर्व उद्योजकांना त्यांनी तयार केलेला माल परदेशात विकला तर त्यांचे कौतुक होते. सरकार त्यांचा गौरव करते. परकीय चलन मिळवून दिले, म्हणून त्यांना शाबासकी देते. आम्ही तयार केलेली साखर, कांदा, कापूस यांवर मात्र आमच्याकडे भरपूर उत्पादन असेल आणि जागतिक बाजारपेठेत चांगला बाजारभाव असेल त्याचवेळेस नेमकी निर्यातबंदी लावली जाते किंवा कोटा लावला जातो. आम्हालाच निर्यातीची बंदी का? असा प्रश्न आपण विचारला का?

मागील वर्षी कापसाच्या जागतिक उत्पादनात झालेली घट आणि त्याचवेळेस देशांतर्गत बीटी कॉटनचा वापर भरपूर आणि योग्य वेळी पडलेला पाऊस यांमुळे कापसाचे झालेले विक्रमी उत्पादन याचा फायदा शेतकऱ्यांना मिळाला. त्यातही सरकारने ५५ लाख गाठींचा कोटा टाकून ठेवलाच होता. तरीही शेतकऱ्यांना सहा ते सात हजारांपर्यंत भाव मिळाला. यावर्षी कमी पावसामुळे व जागतिक बाजारपेठत अधिक उत्पादन झाल्यामुळे कापसाचे भाव पडले आहेत. तरीही सुरुवातीला हे भाव बऱ्यापैकी होते. त्यावेळी नेमकी निर्यातीला परवानगी नव्हती आता हे भाव पडले आहेत. कापूस पट्ट्यामध्ये शेतकऱ्यांना आपला कापूस निदान चार-सहा महिने किंवा एखादे वर्ष साठवून ठेवता येईल, अशी काही व्यवस्था सरकारने केली आहे का? किंवा तशी जर उभी राहत असेल तर त्यासाठी कापूस उद्योगावर असलेली अनेक बंधने शिथिल केली आहेत का? की ज्यांमुळे शेतकरी आपला कापूस बराच काळ साठवून ठेवील आणि बाजारभाव मिळाल्यावरच विक्रीस आणेल, अशी व्यवस्था होऊ शकेल. नेमके कापूस पट्ट्यातच शेतकऱ्यांच्या आत्महत्या दरवर्षी वाढत आहेत. या कापूस शेतकऱ्यांसाठी पंतप्रधानांचे, मुख्यमंत्र्यांचे पॅकेज घोषीत झाले. ते त्यांच्यापर्यंत पोहोचलेच नाहीत. कापसावर काही कायमस्वरूपी विलाज व्हावा यासाठी कापूस पट्ट्यातच सुतगिरण्या उभारण्याची शिफारस करण्यात आली. या सूतगिरण्या आणि जिनिंग नेमक्या राजकारणी लोकांच्या हातातच पडतात. शेतकऱ्यांना त्यांचा कधीच फायदा झाला नाही. साखर उद्योग ज्या प्रमाणे नियंत्रणमुक्त करण्याचा विचार होतो आहे, तसाच विचार आता कापसासाठीही केला जाणार आहे का, असा प्रश्न आपण विचारला का?

जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात लासलगाव, येवला येथील कांदा आवक वाढल्याने कांद्याचे भाव घसरू लागले आहेत. ते दोनशे रुपये ते तीनशे रुपये क्विंटल एवढे खाली गेले आहेत. हे भाव आणखी घसरण्याची शक्यता आहे. यावर्षी कांदा शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आणेल असे उघड दिसत आहे. शेतकऱ्यांना कांदा साठवून ठेवता येईल अशा प्रकारची काहीही व्यवस्था कित्येक वर्षांपासून झालेली नाही. शेतकऱ्यांनीच हे का करू नये, असा प्रश्नही पडू शकतो. कांदा उत्पादक शेतकरी स्वत:साठी झोपडे आणि आपल्या जनावरांसाठी गोठा तरी बांधण्याच्या परिस्थितीत आहेत का? हे एकदा बघावे लागेल, अशा परिस्थितीत दरवर्षी नैसर्गिक आपत्तींचा आणि बाजारातील पडत्या भावाचा सामना करीत किती कांदा उत्पादक, कांदा साठवणुकीच्या चाळी बांधून कांदा चार-सहा महिन्यांसाठी साठवून ठेवू शकतील यात शंकाच आहे. सरकारने कांदा चाळीसाठी अनुदानाचीही घोषणा केली आहे. अर्थात अशा योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे दुरापास्त आहे. मधूनमधून निर्यातबंदी लावणे किंवा कांद्याच्या निर्यातीवर जकात वाढवणे देशात कांदा शिल्लक असताना आयात करणे असे खेळ केंद्रात आलटून-पालटून खेळले जातात. कांदा उत्पादकांच्या मात्र हे खेळ जिवाशी येतात. अशावेळी आमच्या कांद्यावरच नेहमी निर्यातबंदीची कुऱ्हाड का कोसळते? तीस वर्षांपासून कांद्याला जीवनावश्यक वस्तूंच्या यादीतून काढून टाका म्हणजे हा आयात-निर्यातबंदीचा खेळही बंद होईल, असा प्रश्न प्रचारासाठी येणाऱ्या पुढाऱ्यांना आपण विचारला का?

शेतीसाठी ४ टक्के व्याजाने कर्ज मिळणार, अशी घोषणा केंद्रीय कृषीमंत्री दर महिना दोन महिन्यांनी वेगवेगळ्या कार्यक्रमात करतात. असा एखादा शेतकरी ज्याला ४ टक्के व्याजाने कर्ज मिळाले, असा आपल्या पाहण्यात आहे का? असल्यास सरकारी योजनांची जाहिरात करताना त्याचेही बॅनर एखाद्या चौकात जाहिरात करता येईल. असे बॅनर-पोस्टर्स अद्याप तरी कोठेही लावलेले आढळले नाही. आपल्या परिसरात कुणी असल्यास त्याची माहिती शेतकऱ्यांनी घ्यावी. नसेल तर राज्याचे कृषिमंत्री सध्या अगदी छोट्या छोट्या गावांमध्ये पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेचा प्रचार करीत फिरत आहेत. त्यांना नक्कीच एखादा शेतकरी माहीत असेल, त्यांना तरी आपण आम्हाला एखाद्या शेतीसाठी ४ टक्के व्याजाने कर्ज मिळालेल्या शेतकऱ्याचे नाव सांगा असा प्रश्न तुम्ही विचारला का? वेगवेगळ्या योजनांसाठी मोठी पॅकेजेस पाचशे कोटी, हजार कोटी शेतीचा पतपुरवठा दहा हजार कोटींवरून वीस हजार कोटींवर नेणार अशा घोषणा करण्यात येतात. त्या घोषणा कोठे विरतात आणि पैसा कुठे जिरतो याची विचारपूस आता करण्याची वेळ आली होती ती आपण केली का?

बीटी कॉटनसाठी संघटनेने सात वर्षे लढा देऊन २००६ ला बीटीला परवानगी मिळवली यासाठी महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये मोठ्या प्रमाणावर आंदोलन छेडण्यात आले. सरकारचा धिमेपणा आणि पर्यावरणवाद्यांचा आक्रमकपणा या दोघांना भेदून संघटनेने हे यश मिळवले. कापसाचे उत्पादन दुप्पट होण्यापर्यंत बीटी कॉटनचा मोठा वाटा आहे. एका पिकासाठी हे बीटीचे तंत्रज्ञान मिळवायला मोठा संघर्ष करावा लागला. बीटी तंत्रज्ञान अशा प्रकारे अनेक पिकांमध्ये येऊ घातले आहे. सध्या वांग्यामध्ये बीटी तंत्रज्ञान प्रस्तावित आहे. त्याला पुन्हा विरोध होतो आहे आणि तीन वर्षांपासून परवानगी मिळालेली नाही. गावात येणाऱ्या पुढाऱ्यांना निदान बीटी वांग्यातही येऊ शकते आणि तीन वर्षांपासून ते तंत्रज्ञान सरकारने अडवून ठेवले आहे, याची तरी आपल्याला माहिती आहे का? अशी विचारणा आपण एखाद्या उमेदवाराला केली का?

द्राक्ष उत्पादकांना वादळ आणि रोगराई यामुळे दोन वर्षांपासून फटका बसला आहे. द्राक्षांची निर्यात सध्या शुन्यावर आली आहे. या द्राक्षांपासून मद्य तयार करणे आणि हे मद्य कुठल्याही धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक, बंधनात अडकून न पडता लोकांना उपलब्ध होणे आवश्यक आणि शक्य आहे. फक्त त्यातील अडचण एकच आहे, की त्याला मद्याच्या वर्गवारीत टाकल्याने अनेक धार्मिक आणि जातीयवादी पक्ष विरोध करतात. सरकारने त्यावर लावलेले कर हे खरोखर जे देशी आणि विदेशी मद्य आहे त्यापेक्षा कितीतरी अधिक असल्यामुळे द्राक्षापासून निर्माण केलेल्या द्राक्षासवालासुद्धा लोकांना अधिक किंमत मोजावी लागते. त्याचा खप होत नाही. अशावेळी प्रकृतीस उपायकारक आणि कुठलाही सामाजिक, सांस्कृतिक तणाव निर्माण न करणारा द्राक्षासव घराघरात जाणे अबालवृद्धांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. त्याचे मद्य हे संबोधन काढून आणि कर कमी करून हे सहज शक्य आहे. सरकारमात्र ते करीत नाही. हे एवढेच नव्हे तर नाशिक, निफाड या पट्ट्यातील बहुतेक द्राक्ष उत्पादक हे काँग्रेस आणि राष्ट्रवादीचे पाठीराखे आहेत. बगिच्यांच्या लागवडीसाठी सुरुवातीला मिळणारे अनुदान हा एक फायदा सोडला तर द्राक्षांच्या निर्यातीवर दुर्लक्ष, द्राक्षासव तयार

करण्यावर अनेक बंधने आणि कर हे फायदे सोडून कायमस्वरूपी द्राक्ष उत्पादन नफ्यात येईल असे करण्याऐवजी पक्षीय राजकारण तेथे प्रभावी ठरत आहे. द्राक्षासव तयार करणाऱ्या आणि द्राक्ष उत्पादकांनी आमच्यावरील ही बंधने केव्हा उठवणार, असा प्रश्न विचारला की राजकारणी लोकांच्या बरोबर प्रचारात फिरत आहोत आणि त्यांच्या मांडीला मांडी लावून बसणे यातच धन्य मानीत आहोत, असा प्रश्न पुढाऱ्यांना नसेल तर निदान स्वतःच्या मनाला तरी विचारला का?

बाजारसमित्यांसाठी मॉडेल ॲक्ट तयार होऊन कित्येक वर्षे होऊन गेलीत. त्याची अमलबजावणीही सुरू झालेली आहे. ती अशा प्रकारची आहे, की बाजारसमित्या जुन्या कायद्याने चालतात की, मॉडेल ॲक्टप्रमाणे चालू आहेत. हा सावळा गोंधळ, बाजारसमितीत बसणाऱ्या सभापती आणि सभासदांना तरी माहीत आहे की नाही, याची दाट शंका यावी, असा कारभार चालू आहे. या मॉडेल ॲक्टनुसार शेतकऱ्यांवरची अनेक बंधने काढून टाकण्यात आलेली आहेत. आपला शेतीमाल कोठेही विकण्यास त्यांना मुभा आहे, एवढेच नव्हे तर खासगी बाजार उभारण्यासही परवानगी आहे. खासगी बाजार सध्यातरी फारसे कोठे उभे राहिल्याचे दिसत नाही. राहिले तरी शेतकऱ्यांच्याच राजकारण इतके अंगवळणी पडले आहे की, एखादा तालुका पातळीवरचा किंवा जिल्हा पातळीवरच्या सत्ताधारी पुढाऱ्याने त्यात पुढाकार घेतल्याशिवाय असा बाजारही उभा राहू शकणार नाही. बाजारसमितीत अडकून पडलेले पुढारी यासाठी पुढाकार घेणे कदापीही शक्य नाही. झालेच तर, सहकार महर्षींनी सहकारी साखर कारखाने लुटून मिळवलेली माया, आणि राजकारणातील आपले वजन वापरून स्वतःचे खासगी साखर कारखाने काढले आहेत. तसे जर झाले, तरच खासगी बाजार पुढाऱ्यांच्या आश्रयाने उभे राहतील. कदाचित बाप बाजार समितीत सभापती किंवा सभासद आणि मुलाचा किंवा पुतण्याचा खासगी शेतीमाल बाजार असे चित्र दिसेल. मी माझ्या शेतीमालाला कोठेही नेऊन विकील, अशी धमक मी कधी दाखवली का? असा प्रश्न निवडणुकीतील भाषणे ऐकताना तुमच्या मनात कधी उपस्थित झाला काय?

उद्योजकांना आपल्या कंपन्या शेअरमार्केटमध्ये नोंदवून त्यांचे व्यवहार करणे व लोकांचा पैसा समभागाच्या रूपाने आपल्या उद्योगात गुंतवणे, भांडवल उभारणी करणे यासाठी मोकळीक आहे. शेतकऱ्यांना मात्र त्यांच्या वायदे बाजाराला अद्यापपर्यंत कित्येक वेळा वायद्यावर वायदे मिळाले आहेत. शेतीमालाचा वायदेबाजारात समावेश झाल्यास ग्राहकांना तो महाग मिळेल. अशी ओरड केली जाते. अनेक तथाकथित अर्थशास्त्रज्ञ हे सिद्ध करण्यासाठी आकडेवारी घेऊन दरवेळी पुढे सरसावतात आणि शेतीमालाच्या वायदेबाजाराला पुन्हा एक पुढचा वायदा मिळतो. उद्योगक्षेत्राला शेअरमार्केटच्या रुपाने जशी भांडवलउभारणीची सुविधा आहे, आणि सेबीसारखी एक नियंत्रणसंस्था तिचे काटेकोर नियंत्रण करते, तशी मुभा आमच्या शेतीमालाला का मिळत नाही ती मिळावी यासाठी मी स्वतः कधी आवाज उठवला का? की पुढाऱ्यांनी म्हणावे शेतीमालाचा वायदे बाजारात समावेश झाल्यास तो महाग होईल आणि मीही त्याला मान डोलावली, असे झाले आहे का?

एसईझेडसाठी जमिनी घेताना शेतकरी संघटनेने मोठे आंदोलन उभारून आमच्या जमिनी आम्ही मातीमोल भावाने उद्योगांसाठी देणार नाही, सिमेंट, पोलाद, वीज, पाणी, कामगार हे जर उद्योजक बाजारभावाने घेत असेल तर आमची जमीनच फक्त त्यांना मातीमोल भावाने का म्हणून प्रश्न उपस्थित केला. संपूर्ण देशभरातील एसईझेडच्या लढ्याला नैतिक बळ आणि सैद्धांतिक आणि अर्थशास्त्रीय पाया देण्याचे काम संघटनेने केले. यासाठी संघटनेने अगदी सुरुवातीपासून शेतीची मालकी शेतकऱ्यांची असली पाहिजे. घटनेच्या नवव्या शेड्युलमध्ये शेतीसंबंधीच्या सर्व तरतुदी टाकलेल्या आहेत. शेतकरी त्यामुळे शेतीचा मालक राहत नाही. तो केवळ वहिवटदार आहे. या सर्व तरतूद नवव्या परिशिष्टातून काढून टाकाव्यात आणि शेतकऱ्याला शेतीचे मालक बनवावे, त्याला शेती विकायची असेल किंवा कुठल्या विकासकामासाठी सरकारला द्यायची असेल, तरी ती द्यायची की नाही आणि तिचा भाव ठरवण्याचे स्वातंत्र्य त्याला आहे हा आग्रह धरला. त्यासाठी चिखली (पिंपरी चिंचवड), आडगाव (औरंगाबाद) या ठिकाणी आंदोलने केली. अद्यापही शेतीसंबंधीच्या तरतूदी नवव्या परिशिष्टातच आहेत. या परिशिष्टानुसार शेतकऱ्याला शेतजमीन सरकार काढून घेत असेल तर कोर्टात जाण्याची मुभा नाही. फार फार तर मावेजा वाढवून मिळावा यासाठी कोर्टात जाता येते. राज्यभर आणि देशभर अशा प्रकारचे प्रखर आंदोलन चालू असताना आणि कदाचित माझीही जमीन कुठल्या तरी कारणाने काढून घेण्यासाठी कलेक्टरची नोटीस केव्हाही येऊ शकते, असे असताना मी घरातच तर बसलो नव्हतो ना, असा प्रश्न किती शेतकऱ्यांच्या मनात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांचे मतदान करताना आला, की असे झाले निवडणुकीचे ढोल वाजू लागल्यानंतर मी हे सगळे प्रश्न जे माझ्या जीवनमरणाचे आहेत विसरून गेलो? उभा राहिलेला उमेदवार माझ्या भागातील, गावातील, गल्लीतील, जातीचा, नात्याचा आहे हे बघून मी मतदान केले! वरील पैकी कुठल्या संकटाच्या वेळी म्हणजे साखर, कांदा, कापूस यांना निर्यातबंदी लावली, माझी जमीन काढून घेण्यासाठी सरकारने नोटीस पाठवली, अशावेळी हा उमेदवार किंवा त्यांचा नेता कोठे होता? मी जेव्हा माझी समस्या त्याच्याकडे घेऊन गेलो तेव्हा त्याने मला काय काय भूलथापा मारल्या? याची आठवण मतदान करताना माझ्या मनात होती का? निवडणुकीच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर दारू-मटनाचा महापूर वाहिला. मी माझे अमूल्य मत केवळ एका जेवणासाठी किंवा दारूच्या पेल्याच्या बदल्यात तर देऊन मोकळा झालो नाही ना?

निवडणूक तर होऊन गेलेली आहे. मागच्या अशा अनेक निवडणुका झालेल्या आहेत. झालेली निवडणूक ही मागचे पाढे पंचावन्न अशीच झाली. तरीही निराश व्हायचं कारण नाही, महिन्या दोन महिन्यात कुठली तरी निवडणूक येणारच आहे. त्यावेळी तरी आठवण राहील का?

**ज्ञानेश्वर शेलार**
मो. ९२२६७९७०१८

■■



**मा. शरद जोशी यांना देण्यात आलेल्या 'चतुरंग' प्रतिष्ठान जीवनगौरव पुरस्कार प्रसंगी प्रकाशित करण्यात आलेली 'दैनंदिनी २०१२' यात मा. शरद जोशी यांचेवरील विविध विचारवंतांचे लेख संकलित करण्यात आले आहेत. पुस्तकाच्या निवडक प्रती संघटक कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहेत. मूल्य १५० रु.**

# गाय, वाघ आणि स्त्री

दोन वर्षांपूर्वी मराठी गझल या काव्यप्रकाराशी माझी पहिल्यांदा ओळख झाली. कवितेपेक्षा गझल हा काव्यप्रकार पूर्णपणे भिन्न असतो. लयबद्धता हा गझलेचा प्राण असतो. तंत्रशुद्धतेच्या चौकटी काटेकोरपणे सांभाळूनच गझल जन्माला येते. मुक्तछंद किंवा छंदमुक्ततेला गझलेत काहीही स्थान नसते. वेगवेगळ्या तऱ्हेचे पाचपेक्षा जास्त विषय एकाच रचनेत प्रभावीपणे हाताळण्यासाठी गझलेसारखा दुसरा पर्याय असूच शकत नाही. ह्या गोष्टी माझ्यावर एवढा मोठा प्रभाव पाडून गेल्यात की मला गझल या काव्यप्रकाराचे अक्षरशः वेड लागले आणि मी गझलेच्या प्रेमात पडलो.



गंगाधर मुटे

मुंबईच्या अभिव्यक्ती ग्रंथ न्यास या संस्थेतर्फे नुकताच 'गझल : सुरेश भटांनंतर' हा गझलेचा ग्रंथ प्रकाशित करण्यात आला. अभिव्यक्ती ग्रंथ न्यास ही समग्र मराठी गझलेच्या उत्कर्षासाठी झटणारी जनमान्यता पावलेली संस्था. कविवर्य स्व. सुरेश भटानंतर जे गझलकार झालेत त्यांच्या निवडक गझलांचा या ग्रंथात समावेश करण्यात आला असून या ग्रंथात माझ्या तीन गझलांचासुद्धा समावेश करण्यात आलेला आहे. मी गझल लिहायला लागल्यापासून आजपर्यंत काही दिग्गज गझलकारांनी मी गझलेमध्ये जसा आशय व्यक्त करतो, तो गझलियतशी मेळ खात नाही, असे म्हणून माझ्या गझलेला कमी लेखण्याचा जो प्रकार केला, त्या पार्श्वभूमीवर माझ्या गझलांचा या संग्रहात समावेश झाल्याने माझ्या गझलेतील ग्रामीण आशयाला या निमित्ताने जनमान्यतेची अधिकृत पावतीच मिळाली आहे.

दोन वर्षांपूर्वी मराठी गझल या काव्यप्रकाराशी माझी पहिल्यांदा ओळख झाली. कवितेपेक्षा गझल हा काव्यप्रकार पूर्णपणे भिन्न असतो. लयबद्धता हा गझलेचा प्राण असतो. तंत्रशुद्धतेच्या चौकटी काटेकोरपणे सांभाळूनच गझल जन्माला येते. मुक्तछंद किंवा छंदमुक्ततेला गझलेत काहीही स्थान नसते. वेगवेगळ्या तऱ्हेचे पाचपेक्षा जास्त विषय एकाच रचनेत प्रभावीपणे हाताळण्यासाठी गझलेसारखा दुसरा पर्याय असूच शकत नाही. ह्या गोष्टी माझ्यावर एवढा मोठा प्रभाव पाडून गेल्यात की मला गझल या काव्यप्रकाराचे अक्षरशः वेड लागले आणि मी गझलेच्या प्रेमात पडलो.

गझल लिहिणे हे थोडे कलाकुसरीचेच काम असते. काव्य स्फुरले तर कविता लिहिली जाऊ शकते, गझल लिहिली जाऊ शकत नाही. गझल हा तसा कृत्रिमरीत्या काव्य हाताळण्याचा प्रकार आहे. स्फूर्तीमुळे एखाद्या लयबद्ध शेराची किंवा मतल्याची निर्मिती होऊ शकेल; पण उर्वरित चार किंवा त्यापेक्षा जास्त शेर मात्र मतल्यात निश्चित झालेल्या जमिनीला म्हणजे बहर (वृत्त), काफ़िया (यमक) आणि रदीफ (अंत्ययमक) अनुसरून जाणीवपूर्वकच रचावे लागतात. मी तसा गझलेचा अभ्यासक किंवा फारसा वाचकही नाही; पण ज्या काही गझला माझ्या वाचण्यात आल्या त्यात ग्रामीण सुखदुःखाचे पदर असलेली गझल मला आढळलीच नाही. शेती आणि शेतकरी या शब्दांचा गझलेशी दूरान्वयानेही संबंध मला तेव्हाही आढळला नाही, आजही आढळत नाही. अरबीतून फारसीत व फारसीतून उर्दू भाषेत दाखल झालेला हा काव्यप्रकार आता सर्वच भारतीय भाषांत दाखल होऊ पाहत आहे. मराठी भाषेतही गझल हा काव्यप्रकार बऱ्यापैकी रुजलेला आहे. सर्वसाधारणपणे शराब आणि शबाब याविषयाभोवतीच पिंगा घालणाऱ्या पारंपरिक गझलेला मराठी गझलेने फाटा देऊन सामाजिक आशयाची झालर दिली असली तरीसुद्धा विशिष्ट साचेबंद आशयाच्या बाहेर पडून मराठी मातीचा सुगंध पुलकित करणाऱ्या आशयाकडे झेप घ्यायची उत्कंठा मराठी गझलेत अजूनही जागृत झाल्याचे जाणवत नाही. ज्या देशातला बहुसंख्य समाज अनादीकाळापासून शेती याच एकमेव व्यवसायावर गुजराण करीत असला आणि स्वतः अर्धपोटी राहून इतरांना पोटभर जेवू घालत असला तरी शेतीक्षेत्राचे वास्तववादी चित्र प्रतिबिंबित करण्यात जिथे संपूर्ण साहित्यक्षेत्रानेच शेतीक्षेत्राची उपेक्षा केली तिथे नवख्या मराठी गझलेला दोष देण्यात अर्थ नसला तरी या दिशेने पाऊल टाकण्याचे प्रयत्न न होणे, ही मात्र साहित्यक्षेत्राला फारशी शोभादायक बाब खचितच नाही. गझलेला शेतीच्या बांधवर आणून सोडायचे असेल तर त्यासाठी कोणीतरी गझलकार पुढाकार घेईल याची वाट पाहात बसण्यापेक्षा आपणच गझल लिहिण्याचा प्रयत्न का करू नये? अशी माझी भावना झाली आणि मी गझल लिहायचे ठरवले.

मी गझल लिहायचे ठरविले तेव्हा तंत्रशुद्धता आत्मसात करणे ही अभ्यासाने साध्य करण्यासारखी बाब आहे, याची मला जाणीव होती. मुख्य प्रश्न होता आशयाचा. आलंकारिक भाषेत शारीरिक प्रेमभाव व्यक्त करण्यासाठी गझल लिहिणे हा माझा प्रांत नव्हता. तरुण, तरुणी, प्रेमरस, प्रेमभंग किंवा तिचा गजरा, तिच्या नजरा, तिचे चालणे, नटकणे, लचकणे, गालात खळी पडणे या विषयावर एवढ्या गझला लिहिल्या गेल्या आहेत की मी आणखी पुन्हा याच विषयावर गझल लिहावी असे मला वाटत नाही. आधीच कुण्यातरी गझलकाराने लिहिलेल्या ओळींची मोडतोड करून किंवा शब्दांची अदलाबदल करून शेर किंवा गझल रचायची आणि ती आपल्या नावावर खपविण्यासाठी लागणाऱ्या वृत्तीची माझ्याकडे वानवा आहे. शिवाय शेती आणि ग्रामीण जीवन हाताळता येत नसेल तर गझल लिहायची हौस तरी कशासाठी बाळगायची? हा मला पडलेला प्रश्न.

गझलेतील लयबद्धता, वृत्ताची हाताळणी, यमकाचे नादमाधुर्य आणि एकाच गझलेत पाचपेक्षा जास्त वेगवेगळे विषय हाताळायची संधी, हे गझलेने मला वेड लावण्याचे मुख्य कारण होते. त्यामुळे गझल लिहिण्याचा मोह काही केल्या टाळताही येईना. शेवटी ठरले की आपण जे काही लिहायचे, ते शेतीविषयाला अनुसरूनच लिहायचे. गझलेतील आशयाच्या प्रांतात सुद्धा चिरयौवणी ललनेचे मोहक डोळे किंवा शरीरसौंदर्य प्रकटीत करणाऱ्या अवयवाऐवजी आपल्याच शेतातील वांगे, टमाटर, आंबे, चिक्कू, पेरू, गाय, बैल, वासरू इत्यादींना सोबत घेऊन गझलप्रातांत शिरायचे. निर्णय झाला आणि लेखनी उचलली. पहिल्याच प्रयत्नात थोडीशी सूट घेतलेली आनंदकंद या वृत्तातील माझी पहिलीवहिली गझल आकारास आली....

*गायीस अभय देण्या, वाघास दात नाही*
*रजनीस जोजवीण्या, सूर्यास हात नाही.*

*फुलल्या फुलास नाही, थोडी तमा कळींची*
*एका स्वरात गाणे, साथीत गात नाही.*
*रंगात तू गुलाबी, रूपात का भुलावे*
*वांग्या तुझ्या चवीला, मुंगूस खात नाही.*
*खांद्यास नांगराचा का भार सोसवेना?*
*प्राशू नको विषा रे, देहास कात नाही*
*अभयात वाढलेली, वाचाळ राजसत्ता*
*राजा पहूडलेला, राजत्व ज्ञात नाही.*

ही गझल सहा संकेतस्थळावर प्रकाशित केल्यावर रसिकाकडून जोरदार स्वागत झाले. पहिलीच गझलरचना असल्याने कौतुकही झाले पण; दबक्या आवाजात का होईना, भाषाशुद्धता व तंत्रशुद्धतेतील दोन निकष पाळले गेले नसल्याची खंतही व्यक्त झाली. देण्या ऐवजी देण्यास आणि जोजविण्या ऐवजी जोजविण्यास असे असायला हवे होते आणि तसे केले तर वृत्त बिघडणार होते. दुसरा मुख्य नियम असा की, मतल्याच्या किंवा शेराच्या पहिल्या ओळीत विषयाची प्रस्तावना व दुसऱ्या ओळीत पहिल्या ओळीत जी प्रस्तावना व्यक्त झाली असेल तिचा प्रभावी समारोप असायला हवा. शेरातील दोन ओळींचा परस्पर संबंध असायलाच हवा. त्यामुळे

*गायीस अभय देण्या, वाघास दात नाही*
*रजनीस जोजवीण्या, सूर्यास हात नाही.*

हा मथळा डोक्यावरून गेल्याच्या किंवा काहीही अर्थच लागत नसल्याच्या प्रतिक्रिया उमटल्यात. त्या निमित्ताने थोडक्यात या मथळ्यामागची पार्श्वभूमी उलगडण्याचा मी प्रयत्न केला. माझ्या मते त्या मथळ्याचा अर्थ खालीलप्रमाणे असू शकतो.

बाईत आणि गायीत मला नेहमीच एक साम्य आढळत आले आहे.

दोघीही शारीरिक अंगाने अबलाच. स्वबळावर स्वसंरक्षणास असमर्थ.

निसर्गाने सर्व सजीवांना नैसर्गिक मृत्यू येईपर्यंत स्वबळावर स्वसंरक्षण करून प्राण वाचविण्यासाठी काही जन्मजात काही हत्यारे आणि ढाली दिल्या आहेत.

उदाहरणार्थ, उंदराला बिळात घुसता येते, मांजरीला बिळात घुसता येत नाही त्यामुळे उंदराचे रक्षण होते. याच अर्थाने मांजरीला भिंतीवर चढता येते, कुत्र्याला भिंतीवर चढता येत नाही. या झाल्या उंदीर आणि मांजरीच्या स्वसंरक्षणाच्या ढाली.

याच प्रमाणे आपल्या दात आणि नखांचा वापर करून कौशल्याने अन्न मिळविण्यासाठी उपयोग करणे हे झाले उंदराचे हत्यार. त्याच प्रमाणे मांजर शिकार मिळविण्यासाठी ज्या ज्या अवयवांचा वापर करते ते झाले मांजरीचे हत्यार.

मुद्दा अधिक स्पष्ट होण्यासाठी - उदाहरणे बघूयात.

हरणाला वाघ-सिंहापेक्षा आणि सशाला त्याच्या शत्रूपेक्षा अधिक वेगवान वेगाने पळता येते. माकडाला झाडावर चढता येते. मोराला बचावापुरते उडता येते. मुद्दा एवढाच की बचावासाठी सजीवाकडे नैसर्गिकरीत्या हत्यार/ढाल/कौशल्य यापैकी काहीतरी नक्कीच आहे.

मात्र मानव जात आणि त्याचे बहुतेक पाळीव प्राणी यांचेकडे निसर्गतः यापैकी काहीही नाही. निदान मानवाकडे बुद्धी आणि साधने बनविण्याची कला तरी आहे. मानवाने बुद्धीचा वापर करून साधने बनविली आणि त्या साधनांचा हत्यारासारखा उपयोग करून संपूर्ण सजीव सृष्टीवर हुकुमत मिळविली. हातात साधन नसेल तर मानवाएवढा दुर्बल कोणीच नाही. विनाहत्याराने मनुष्य साध्या मधमाशीसोबत सुद्धा लढू शकत नाही. साधनविरहीत माणसाला, कावळासुद्धा पराजित करू शकेल.

पण गायीचे काय? गाय पूर्णतः संरक्षणासाठी मानवावर अवलंबून. कल्पना करा. (कल्पना काय फक्त कवींनीच करायच्या? आणि रसिकांनी फक्त टाळ्या वाजवायच्या?) कल्पना करा की जर उद्या मानवाला गाय निरूपयोगाची आणि परवडेनाशी वाटली तर माणूस गायीचा त्याग करणार. कारण नकोशा गोष्टीचा बिनदिक्कत त्याग करणे हा मूलभूत मानवी स्वभावच.

गायीवरचे प्रेम, भूतदया वगैरे दिखावाच. जर तसे नसते तर गाय फक्त शेतकऱ्यांच्याच दारात नसती दिसली. गाय दिसली असती कलेक्टर, मंत्रालय, राजकीय पक्षांची कार्यालये वगैरे ठिकाणी गाय बांधलेली आढळली असती आणि सकाळी उठून कलेक्टर शेण सावडतांना आणि मुख्यमंत्री दूध काढताना आढळले असते.

मग नकोशा गोष्टीचा बिनदिक्कत त्याग करणे हा मूलभूत मानवी स्वभाव असलेल्या माणसाने गायी पाळणे बंद केले तर काय होईल? गायीचे काय होईल? वाढत्या यांत्रिकीकरणाने बैलांची गरज संपत चाललेली. दुधाच्या किंमती आवाक्यात आहे तोपर्यंत ग्राहक दूध पिणार.

यदाकदाचित दुधाचे भाव ५०० रु. प्रतिलीटर झालेत तर निव्वळ गायीच्या प्रेमापोटी दूध खरेदी करणाऱ्या ग्राहकांची संख्या किती?

जर अशी स्थिती उद्भवली आणि दुधाचा धंदा न परवडणारा झाला तर कोणी कशाला गायी पाळतील? मग अशा विपरीत परिस्थितीत माणूस गायीचा त्याग करणारच. मग गायीचे काय होईल? कशी जगेल बिचारी? जंगलात ती शत्रूपासून स्वसंरक्षण करू शकत नाही कारण गायीला ना बिळात घुसता येत, ना झाडावर चढता येत, ना हवेत उडता येत, ना अती वेगाने पळता येत. शत्रुशी दोन हात करायला ना दात ना नखे, ना हत्तीसारखे शक्तिशाली सोंड. शेपटी आणि शिंगांची ताकत व धार उत्क्रांतीच्या प्रवाहात क्षीण झालेली. मग ती स्वबचाव कशी करेल? तेव्हा तिला तिच्या संरक्षणार्थ गरज पडेल एका बलशाली सहकाऱ्याची. मग तो सहकारी कोण? गायीला जेवढे नैसर्गिक शत्रू आहेत त्या सर्वांना पराभूत करून गायीला जीवदान, अभय देण्याची शक्ती केवळ सिंह, वाघापाशीच. सिंह, वाघाशिवाय गायीचे रक्षण कोणीच करू शकत नाही. आणि नेमकी येथेच बंडी उलार होते. जो गायीचे रक्षण करू शकतो तोही तिचा शत्रूच. गाय वाघाकडे अभय मागण्यास गेली तर वाघोबा तिला अभय देण्याऐवजी तिच्यामध्ये आपले खाद्य शोधणार. भूक शमविण्याची वस्तू या नजरेने पाहणार. ज्याच्याकडे आश्रयाला जावे तोच काळशत्रू ठरणार.

कारण..

वाघाकडे जे दात आहेत ते गायीला खाण्यासाठीच! तिचे प्राण वाचवू शकेल, अभय देऊ शकेल, असे दात वाघाजवळ आहेतच कुठे? ज्याच्याकडून रक्षणाची अपेक्षा केली जाऊ शकते तोच जर भक्षक ठरणार असेल तर. म्हणून गाय आणि स्त्री या दोघीत याच अनुषंगाने विचार केला तर दोघींच्याही व्यथा सारख्याच वाटतात मला.

गायीस अभय देण्या,वाघास दात नाही
रजनीस जोजवीण्या,सूर्यास हात नाही.

**गंगाधर मुटे**
आर्वी छोटी - ४४२३०७,
तह. हिंगणघाट, जि. वर्धा.
gangadharmute@gmail.com
www.baliraja.com, मो. ९७३०५८२००४

■■

# अशी कशी जाईल महागाई?

साऱ्या महागाईचा रोख व दिशा हा आंतरराष्ट्रीय बाजारातील दरांशी समरूपता साधण्याकडे आहे. ही प्रक्रिया रोखणे हे कोण्या सरकारच्या हाती आहे किंवा नाही हे देखील आज कुणाला सांगता येणार नाही. ही सारी प्रक्रिया किती टप्प्यात वा किती कालावधीत पूर्ण होईल हेही आज सांगणे तसे कठीण आहे. कांहीच्या मते आपण मुक्ततेला प्राधान्य देऊन बंदिस्त व्यवस्थेतील विकृती वा तफावती किती लवकर निवारण करतो यावरही हे अवलंबून आहे. भारतातील बव्हंशी लोकसंख्या ही कृषिक्षेत्रावर अवलंबून आहे आणि अर्थव्यवस्थेतील निर्धारित वाटा जर या लोकसंख्येपर्यंत पोहचून त्यांची क्रयशक्ती वाढली नाही तर आज महाग का होईना मिळणारे खाद्यान्न पुढे मिळेलच की नाही यावर प्रश्नचिन्ह उभे रहायची शक्यता आहे.



गिरधर पाटील

सत्ताकारण करणाऱ्या या वर्गाचे एक बरे असते. समस्या मग ती पाण्याची असो, वीजेची असो वा महागाईची, सरकार काय काय करतेय याची बेसुमार आकडेवारीसह जंत्री सादर करायची, आपल्याच काही जूजबी चुकांची कबूली द्यायची आणि त्याबरोबर समजूत काढण्यासाठी सद्यस्थितीला स्पर्श न करता भविष्याचे एक भ्रामक चित्र रंगवायचे असा हा सारा रिवाज झाला आहे. आटोक्यात न येणाऱ्या महागाईबद्दल विनय कोरे यांचा भडकती महागाई आवरायची कशी? हा राजकीय पैलू असलेला लेख असाच म्हणता येईल. मुळात मूळ प्रश्नाचे आकलनच जर एवढे ठिसूळ असेल तर मुख्यमंत्र्यांच्या समित्यांच्या नेमणुकांसारखे उपायही काहीतरी करण्याच्या प्रक्रियेचे केवळ एक भाग ठरतात.

जागतिकीकरणपूर्व काळातील साऱ्या महागाया या बंदिस्त अर्थव्यवस्थेतील असल्याने त्यांचे इप्सितसाध्याचे चक्र पूर्ण झाले की, आपोआप आटोक्यात येत व सरकार हुश्श करीत त्याचे श्रेय स्वतःकडे उपटत असे. मात्र या महागाया तशा कमी झाल्याचे समजण्यात आले तरी कुठलीही महागाई आजवर पूर्ण वा पूर्व (Absolute) पातळीवर कधीही आलेली नाही. महागाईत गाठलेल्या उच्चांकाच्या काही निम्नस्तरावर येऊन जरी स्थिरावली तरी हायसे मानले जात असे. मात्र आजची महागाई ही जागतिकीकरणपूर्व काळातील महागाईपेक्षा अतिभिन्न आहे आणि आताच्या दरवाढीच्या कारणांची सारी परिमाणे देखील बदलली आहेत. त्यामुळे नेहमीसारखे मागणी-पुरवठ्याचे, तुटवडा-टंचाईचे गणित वा साठेबाजीसारखी कारणे धोपटत बसलो तर या समस्येच्या मुळाशी जाणेच कठीण होईल व साहजिकच उपाययोजनाही तशाच वरवरच्याच राहतील. जागतिकीकरणाचे देशांतर्गत बाजार व्यवस्थेवर झालेले परिणाम, भारतीय समाज घटकांच्या जीवनपध्दती व क्रयशक्तीत झालेले बदल, भारतीय शेतकऱ्यांचे बाजार व्यवस्था व तंत्रज्ञान क्षेत्रातील मागासपण, शेतमाल उत्पादनांच्या निविष्ठांच्या सतत वाढत्या किंमती, व्याजाचे दर कमी राहिल्याने गुंतवणूक क्षेत्राकडे वाढता राहिलेला पैशांचा ओघ, सततच्या तुटीच्या अर्थसंकल्पामुळे बाजारात धुमाकूळ घालणारा चलन फुगवटा, या परिस्थितीचा चपखल वापर करून घेणाऱ्या व भारतीय बाजाराला नवीन असणाऱ्या वायदे बाजारासारख्या संकल्पना व शेतमाल बाजारातील एकाधिकाराची कोंडी फुटून पर्यायी विक्री व्यवस्थांची उपलब्धता ही सारी कारणे लक्षात घ्यावी लागतील. याचबरोबर सरकार पातळीवर जागतिकीकरणासाठी आवश्यक असणाऱ्या मूलभूत बदलांना होत असणारा विरोध, त्यामुळे बाजारात निर्माण झालेल्या विकृती व त्याचवेळी जागतिकीकरणविरोधी अन्नधान्याच्या डागाळलेल्या आयात-निर्याती अशा अनेक अनुषांगिक कारणांचा देखील विचार करता येईल.

यातील एक महत्वाचे कारण म्हणजे गेली कित्येक वर्षे आंतरराष्ट्रीय व भारतीय बाजारातील अन्नधान्याच्या दरात रहात आलेली तफावत. भारतीय शेतमाल बाजार आजवर ही एक नियंत्रित, हस्तक्षेपी व बंदिस्त व्यवस्था रहात आली असल्याने त्याचे आंतरराष्ट्रीय बाजाराशी समायोजन होणे जवळजवळ अशक्यच होते. या बाबतीतला औद्योगिक उत्पादनांच्या वा सोन्याच्या दर तफावतीमुळे फोफावलेल्या स्मगलिंगचा अनुभव आपण सगळ्यांनी घेतला आहे. एवढेच नव्हे तर त्याकाळी पाकिस्तान व बांगलादेशात भारतीय साखर, कापूस या शेतमालाचे देखील स्मगलिंग होत असे. जागतिकीकरणात मात्र खुलीकरणाच्या प्रक्रियेनंतर या बंदिस्तपणाचे बुरूज ढासळायला लागले व जागतिक व्यापार संस्थेला आपण दिलेली माहिती, किंबहुना एकंदरीत माहितीच्या आदानप्रदानाच्या वाढत्या शक्यतांमुळे भारतीय शेतकऱ्यांना आंतरराष्ट्रीय बाजार व त्यातील बाजार भावाची किलकिलती का होईना ओळख होऊ लागली. भारतीय बाजारात परदेशी सफरचंदे वा संत्री या दुप्पट, तिप्पट नव्हे तर पांचपट भावाने सहज विकली जाऊ शकतात हे भारतीय शेतकरी पहिल्यांदाच अनुभवत होता. या तफावतीच्या दरांमुळे भारतीय कृषिक्षेत्रात एक अस्वस्थता वाढत होती व त्याचवेळी या नवबाजाराचे लाभ पदरात पाडण्याच्या प्रयत्नांनादेखील सुरूवात झाल्याचे दिसते. त्याच दरम्यान भारतात वाढते शहरीकरण, सेवाक्षेत्रातील नवश्रीमंतीचा उदय व त्यामुळे श्रमबाजारातील वाढते रहाणारे श्रममूल्य, यामुळे व सहाव्या वेतन आयोगासारख्या वेतनश्रेणींमुळे वाढलेली क्रयशक्ती, या साऱ्यांचा बाजार व्यवस्थेवर एक वेगळाच प्रभाव पडू लागला. याच दरम्यान भारतात मॉल संस्कृतीचा उदय झाला व भारतीय शेतमालाला भारतातच या नवीन व्यवस्थेत बऱ्यापैकी भाव मिळू शकतात हे अधोरेखित झाले. त्यामुळे कधीकाळी उत्पादन खर्चावर आधारित भावाची मागणी करणारा शेतकरी आताशा बाजारात मिळू शकणाऱ्या भावाची मागणी करू लागला आहे.

शेतमालाचे भाव कृत्रिमरित्या कमी ठेवत आल्यामुळे आजवर आपणा सर्वांना शेतमाल स्वस्तात मिळत होता. आपण गरीब असल्याने निदान खाद्यान्नाचे दर कमी असावेत व ती सरकारचीच जबाबदारी असल्याचे समजले जात असे. ही जबाबदारी पूर्ण करण्यासाठी सरकार कमाल पातळीवर शेतमाल बाजारात हस्तक्षेप करीत असे, अजूनही करते आहे. परंतु जागतिकीकरणामुळे सरकारची हत्यारे काहीशी बोथट झाली आहेत व त्यामुळेच बाजार जुमेनासा होऊन ही महागाई आटोक्यात आणण्याचे सरकारचे सारे प्रयत्न निष्फळ ठरताहेत. अजूनही भांबावलेले सरकार काहीतरी चमत्कार होईल व आपली सुटका होईल या स्वप्नरंजनात मग्न आहे. तोवर कालहरण करण्यासाठी व सरकार काहीच करीत नसल्याचे चित्र तयार होऊ नये म्हणून या समित्या, त्या समित्या नेमण्याचे कार्यक्रम धडाक्यात चालू आहेत. एवढेच नव्हे तर पन्नास रूपयांवर गेलेली साखर तीसपस्तीसवर स्थिरावल्यावर महागाई आटोक्यात आणल्याच्या वल्गना केल्या जात आहेत.

हे सारे समजून घेण्यासाठी बाजार व्यवस्थेतील काही मूलभूत संकल्पना समजून घेतल्या पाहिजेत. बाजारात होणाऱ्या वस्तुंच्या आदानप्रदानात या

पान १६ पाहा

# डळमळीत प्रजासत्ताक



सुधाकर जाधव

**भ्रष्टाचाराविरुद्ध भावनिक वातावरण तयार करून लोक निर्वाचित व्यवस्था दुबळी आणि दुय्यम बनविण्यासाठी लोकांचाच उपयोग या आंदोलनाने केला आहे. हिटलरने जर्मनीतील लोक निर्वाचित व्यवस्था लोकांच्या झुंडी संघटीत करून उलथून टाकली अगदी त्याच पद्धतीने या आंदोलनाने राज्यकर्त्यांच्या चुकांचा फायदा घेऊन लोकशाही व्यवस्थेलाच धडका दिल्या. आंदोलनाचा लोक निर्वाचित व्यवस्थेवर विश्वास असता तर भ्रष्ट प्रतिनिधींच्या जागी नवे लोकप्रतिनिधी आले पाहिजेत असा आग्रह धरला असता. प्रजासत्ताकाच्या वृक्षावरील नासक्या आंब्याना काढून आणि प्रसंगी त्या झाडाच्या काही फांद्या छाटून तो वृक्ष बहरेल असा प्रयत्न झाला असता; पण त्या ऐवजी तो वृक्ष मूळापासून उखडण्याचा प्रयत्न झाला. या प्रयत्नातूनच आपले प्रजासत्ताक डळमळीत झाल्याचे पाहायला मिळते.**

भारताच्या राष्ट्रपती महामहीम प्रतिभाताई पाटील यांनी ६३ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्राला उद्देशून बोलताना भारतीय प्रजासत्ताकाच्या वृक्षावरील सडलेली फळे काढण्यासाठी ते झाडच उपटून टाकण्याचा अविवेकी प्रयत्न न करण्याचे समयोचित आवाहन केले आहे. या आवाहनातून दोन गोष्टी स्पष्ट होतात. एक, भारतीय प्रजासत्ताकाच्या वृक्षावर मोठया संख्येने फळे सडली आहेत. या सडक्या फळांच्या दुर्गंधीने त्या वृक्षाच्या सावलीत राहणे सर्व सामान्य जनतेला अशक्यप्राय झाले आहे. दोन, प्रजासत्ताकाचे वैरी देशातील राजकीय य नेतृत्व सगळी चांगली फळे काढून फक्त खराब फळेच झाडावर ठेवतात व त्यातून दुर्गंधी निर्माण होते आणि म्हणून सामान्य जनतेसाठी हा वृक्षच निरुपयोगी असल्याचे जनमानसावर ठसवून तो मुळापासून उखडून टाकण्यासाठी सर्व सामान्यांना चिथावीत आहेत. झाडावर फळे सडवून जनतेचे जगणे हराम करण्याचा संदर्भ अर्थातच देशाच्या राजकीय प्रक्रियेच्या घुसळणीतून तयार होणाऱ्या अमृतावर डल्ला मारून हलाहल जनतेला पचवायला लावणाऱ्या इथल्या राजकीय, सामाजिक व आर्थिक व्यवस्था व या व्यवस्थेचे व्यवस्थापक यांचेशी सरळच जुळतो आणि भारतीय प्रजासत्ताकाचा वृक्षच निरुपयोगी असल्याची आवई उठवून त्या वृक्षाची अर्थातच प्रजासत्ताकाची पाळेमुळे खिळखिळी करण्याचा संदर्भ अण्णा आंदोलनाशी जुळणारा व जोडणारा असल्याचे गेल्या वर्षभरातील घटनांवरून स्पष्ट होते. जनतेने या झाडाची सावलीही अनुभवली आहे आणि सडक्या फळांची दुर्गंधीदेखील. त्यामुळे जनता संभ्रमित आहे. तिला झाडाची सावली हवी आहे आणि झाडावरील सडक्या फळापासून मुक्ती देखील. या वृक्षाची रसाळ गोमटी फळे रखवालदार खाऊन टाकतात आणि जनतेसाठी टाकाऊ, सडकी फळे मागे ठेवतात या अण्णा आंदोलनाच्या आरोपात तथ्य आहे आणि लोकांच्याही ते लक्षात आल्याने लोक या आंदोलनात मोठ्या संख्येने उतरले. सर्वसाधारणपणे जनआंदोलने लोकांची ताकद वाढवून लोकशाही प्रक्रिया मजबूत करीत असतात; पण अण्णाआंदोलन याला अपवाद ठरू पाहात असल्याची भावना देशात मोठ्या प्रमाणावर पसरली आहे. महामहीम राष्ट्रपतींनी आपल्या भाषणातून हीच लोकचिंता व लोकभावना मुखर केली आहे. देशाच्या सर्वोच्च पदावर बसलेल्या व्यक्तीने व्यक्त केलेली चिंता खरी आहे यात शंकाच नाही; पण भारतीय प्रजासत्ताकाच्या वृक्षावरील रसाळ गोमटी फळे काढून सडकी फळे लोकांसाठी सोडणाऱ्या रखवालदारांच्या प्रवृत्तीवरसुद्धा राष्ट्रपतींनी कोरडे ओढून प्रजासत्ताकाचे रखवालदारच प्रजासत्ताकाची मान वैऱ्याच्या सुरी खाली ढकलीत असल्याचे वास्तव राष्ट्रपतींनी नजरेआड केले आहे. अण्णा आंदोलनाला जसा त्यांनी सडकी फळेच पाडा, झाड पाडण्याची चूक करू नका हे सांगितले, तसेच प्रजासत्ताकाच्या रखवालदारांनासुद्धा ते ज्या फांदीवर बसले आहेत त्या फांदी तुटणार नाही याची दक्षता घ्यायला सांगायला हवे होते. राष्टपतीपदाचा ते सांगण्याचा अधिकार आहे आणि कर्तव्यसुद्धा; पण फारच थोड्या प्रसंगी त्या पदावरील व्यक्तींनी हा अधिकार आणि कर्तव्य बजावले आहे. त्याचमुळे राष्ट्रपतीपद कधी राष्ट्रपाल किंवा लोकपाल होऊ शकले नाही आणि वेगळ्या लोकपालच्या मागणीने मूळ पकडले आहे.

## प्रजासत्ताकाला हादरे

अण्णा आंदोलनाने प्रजासत्ताकाला हादरे दिल्याचे त्या आंदोलनाचे नेतृत्व मान्य करीत नसले तरी तसे ते बसले आहेत आणि त्याने प्रजासत्ताक डळमळीतदेखील झाले आहे. देशातील सर्वच क्षेत्रातील प्रस्थापित नेतृत्व लोक निराशेला कारणीभूत होत असताना अण्णा आंदोलनाने त्याची सांगड देशाच्या संसदीय लोकशाही व्यवस्थेशी घातली. प्रजासत्ताकाच्या वृक्षावरील सगळी रसाळ गोमटी फळे संसदीय व्यवस्थेचा भाग असणाऱ्या सर्वच राजकीय नेतृत्वाने फस्त केली आणि तशी ती फस्त करण्यात लोकशाही व्यवस्थेची त्यांना मदत झाली हे या आंदोलनाचे मध्यवर्ती सूत्र राहिले आहे. राजकारणी म्हणजे भ्रष्टाचारी आणि या भ्रष्टाचारी समूहाचे निवासस्थान म्हणजे संसद आणि संसदीय व्यवस्था अशी या आंदोलनाची त्याच्या नेतृत्वाकडून अनेकदा जाहीर आणि अधिकृत मांडणी झाली आहे. लोकांच्या मनात देशामध्ये वाढत चाललेली सर्वच क्षेत्रांतील (म्हणजे अगदी धार्मिक, सांस्कृतिक क्षेत्रातीलसुद्धा) नेतृत्वाची असंवेदनशीलता, स्वार्थपरायनता, वाढती विषमता, शेती आणि ग्रामीण क्षेत्राला मिळणारी सवतीची आणि विषम वागणूक, यातून वाढणारे दारिद्र्य याविषयी म्हणजे एकूणच व्यवस्थेविरुद्ध जनमानसात वाढीला लागलेला असंतोष अण्णा आंदोलनामुळे राज्यकर्त्यांच्या भ्रष्टाचारावर केंद्रित झाला. जनतेच्या मनात एकूणच व्यवस्थेचा राग वाढत होता तरी आपण निवडून दिलेले लोक आपल्या बाबतीत अतिशय असंवेदनशील बनत चालले आहेत आणि त्यातून व्यवस्थेचा मार कमी बसावा म्हणून हवे असलेले संरक्षण मिळत नाही हे शल्य त्यांना जास्त बोचत होते. एकूण

भ्रष्टाचारावर प्रकाश टाकण्यापेक्षा राजकारण्यांच्या भ्रष्टाचारावर बोलणे आणि त्यावर जनतेच समर्थन आणि सहानुभूती मिळविणे अण्णा आंदोलनाला सोपे गेले ते याच मुळे; पण लोकांचा खरा राग भ्रष्टाचारावर कधीच नव्हता. एवढ्या मोठ्या भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलना नंतरही पाच राज्यातील विधानसभा निवडणुकीत या मुद्द्यांचा किंवा या आंदोलनाचा अत्यल्प प्रभाव दिसला नसता. अण्णा आंदोलन सर्व स्तरावरील भ्रष्टाचाराबाबत बोलत असले तरी सगळा रोख हा राज्यसंस्थेतील भ्रष्टाचारावर केंद्रित होता. तो तसा असल्यामुळे आपला मतलब साध्य करण्यासाठी दररोज भ्रष्टाचारात लिप्त असलेले बिनदिक्कतपणे भ्रष्टाचार विरोधाची पताका आपल्या खांद्यावर घेऊ शकले. पदोपदी भ्रष्टाचाराला जन्म देणाऱ्या व्यवस्थेविरुद्ध लढल्याशिवाय भ्रष्टाचार कमी होणे शक्य नव्हते; पण या आंदोलनाने व्यवस्थेविरुद्धचा लोकांचा राग मूठभर राज्यकर्ते व या राज्यकर्त्यांना संधी देणारी राजकीय व्यवस्था यावर केंद्रीत केल्यानेच लोकशाही व्यवस्थेला हादरे बसले. भ्रष्ट राज्यकर्त्यांना दूर करण्याची मागणी या आंदोलनाने कधीच केली नाही हे लक्षात घेतले पाहिजे. राज्यकर्त्यांपैकी २-४ लोकांना काढून टाकण्याची मागणी वेगळी आणि भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर हे सरकार गेले पाहिजे हा आग्रह धरणे वेगळे. संसदेतील कामकाज व संसद सदस्याचे वर्तन यावर सदैव विरोधी बोलणाऱ्या या आंदोलनाने कधीही ही संसद विसर्जित करून नव्या निवडणुका घेण्याची मागणी केली नाही. याचे कारण लोक योग्य प्रतिनिधी निवडून देऊ शकतील असा या आंदोलनाच्या कर्णधारांना विश्वासच नव्हता आणि नाही. जयप्रकाशजींच्या नेतृत्वाखालील बिहार आंदोलनाने बिहार विधानसभेच्या तर गुजरातमधील आंदोलनाने गुजरात विधानसभा विसर्जित करण्याची मागणी केली होती. कारण त्या आंदोलनाचा लोकांच्या निर्णय शक्तीवर आणि राज्यकर्त्यावर अंतिमतः लोकांचे नियंत्रण असले पाहिजे या लोकशाहीच्या मूळ तत्त्वावर विश्वास होता. असा विश्वास या आंदोलनाला लोकावर कधीच वाटला नाही. म्हणून यांची उपाय योजना वेगळ्या धर्तीची होती. ज्याच्या जडणघडणीत जनतेचे काहीच स्थान असणार नाही असा लोकपाल लोक निर्वाचित व्यवस्थेच्या डोक्यावर बसविणारी नवी व्यवस्था निर्माण करण्यावर या आंदोलनाचा जोर राहिला आहे. भ्रष्टाचाराविरुद्ध भावनिक वातावरण तयार करून लोक निर्वाचित व्यवस्था दुबळी आणि दुय्यम बनविण्यासाठी लोकांचाच उपयोग या आंदोलनाने केला आहे. जर्मनीतील लोक निर्वाचित व्यवस्था लोकांच्या झुंडी संघटीत करून उलथून टाकली अगदी त्याच पद्धतीने या आंदोलनाने राज्यकर्त्यांच्या चुकांचा फायदा घेऊन लोकशाही व्यवस्थेलाच धडका दिल्या. आंदोलनाचा लोक निर्वाचित व्यवस्थेवर विश्वास असता तर भ्रष्ट प्रतिनिधीच्या जागी नवे लोकप्रतिनिधी आले पाहिजेत असा आग्रह धरला असता. प्रजासत्ताकाच्या वृक्षावरील नासक्या आंब्याना काढून आणि प्रसंगी त्या झाडाच्या काही फांद्या छाटून तो वृक्ष बहरेल असा प्रयत्न झाला असता; पण त्या ऐवजी तो वृक्ष मूळापासून उखडण्याचा प्रयत्न झाला. या प्रयत्नातूनच आपले प्रजासत्ताक डळमळीत झाल्याचे पाहायला मिळते.

## प्रजासत्ताकवाद्यांचा भ्रम

आपली लोकशाही भर भक्कम पायावर उभी आहे हा समज या देशातील प्रत्येक लोकशाहीप्रेमी नागरिकात आहे. थोर स्वातंत्र्यसेनानी जयप्रकाश नारायण यांनी आणीबाणीच्या काळात तुरुंगातून सुटका झाल्या नंतर बीबीसी रेडिओला दिलेल्या मुलाखतीत हेच सांगितले. इंदिरा गांधी आणिबाणी लादून या देशातील लोकशाही गुंडाळू शकतील अशी आपण स्वप्नातही कल्पना केली नव्हती याची कबुली त्यांनी दिली. जयप्रकाशजींसारखे ज्या भ्रमात होते तशाच भ्रमात आजचे लोकशाहीप्रेमी आहेत. लोकशाही व्यवस्थेला जडलेले रोग त्यांना चांगलेच माहीत आहेत; पण या रोगाने लोकशाहीचे मरण येऊ शकते हे त्यांच्या ध्यानीमनीही नाही. स्वातंत्र्याच्या आंदोलनातून सत्तेत आलेल्या राज्यकर्त्यांचे जनतेशी असलेले नाते आणि आजच्या राज्यकर्त्याचे जनतेशी असलेले नाते, जनतेप्रती असलेली संवेदनशीलता यात जमीन अस्मानाचे अंतर आहे. स्वातंत्र्यसंग्रामात सहभागी असलेल्या सत्ताधाऱ्यांची जनतेप्रती दायित्वाची व संवेदनशीलतेची भावना जयप्रकाश नारायण यांच्या संपूर्ण क्रांती आंदोलनापर्यंत लोपत आली होती. किंबहुना त्यामुळेच ते आंदोलन उभे राहिले होते. लोकप्रतिनिधींनी जनतेप्रति जबाबदार असले पाहिजे ही लोकभावना त्या आंदोलनाने पहिल्यांदा समोर आणली. ही बाब लोकप्रतिनिधीच्या मर्जीवर न सोडता लोकप्रतिनिधी जबाबदार राहील अशी संस्थात्मक व संविधान अंतर्गत व्यवस्था निर्माण करण्याचा आग्रह जेपी आंदोलनाने धरला होता; पण आणिबाणी संपून पुन्हा लोकशाही अवतरल्याच्या जल्लोषात तशी व्यवस्था निर्माण करण्याची मागणी मागेच पडली नाही तर विसरल्या गेली. तेव्हाच 'लोकप्रतीनिधीना परत बोलावण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार देण्यासाठी प्रयत्न झाला असता तर आमची राज्यव्यवस्था बेलगाम, बेजाबदार आणि लोकप्रति संवेदनशून्य बनली नसती. अण्णा आंदोलनाने लोकशाहीला हादरे दिले असतील; पण या आंदोलनाचा जन्म बेलगाम, बेजाबदार आणि संवेदनशून्य राजकीय व्यवस्थेतून झाला आहे हे विसरणे म्हणजे जयप्रकाशांच्या संपूर्ण क्रांती आंदोलनाने केलेल्या चुकीची पुनरावृत्ती करण्यासारखे होईल. आमची निवडणूक व्यवस्था एवढी सदोष बनली आहे की त्यातून खरा लोकप्रतिनिधी निवडणे अशक्य होऊन बसले आहे. २०-२५ टक्के मतदार आमचा लोकप्रतिनिधी ठरवितात. निवडल्यापासूनच लोक आणि लोकप्रतिनिधी यांचा काहीच संबंध नसतो. या पद्धतीत धनदांडगे, गुंड आणि अपराधी तसेच जातीय द्वेष फैलावणारे आणि धर्मांध लोक निवडून येण्यास अधिक वाव आहे. असे मुजोर लोक निवडून गेल्यावर जनता त्यांच्यावर नियंत्रण ठेवेल अशी कोणतीच व्यवस्था नाही. यासाठीच या देशाला निवडणूक सुधारणांची नितांत गरज आहे. उमेदवाराला नाकारणे किंवा परत बोलावणे हे दोन्ही अधिकार लोकप्रतिनिधी वर लोकांच्या नियंत्रणासाठी अनिवार्य आहेत. लोकशाहीचा वटवृक्ष उन्मळून पडू नये असे वाटत असेल तर निवडणूक सुधारणांचा मुद्दा ऐरणीवर आणला पाहिजे. राष्ट्रपतींच्या भाषणात लोकशाही वाचविण्याची कळकळ असली तरी ती प्रत्यक्षात येण्या बद्दलचे कोणतेही मार्गदर्शन नाही. देशातील राजकीय वर्ग गोंधळात पडल्याचे हे लक्षण आहे; पण लोकशाही संकटात आहे याची जाणीव राजकीय वर्गाला झाली एवढेच समाधान राष्ट्रपतीचे भाषण देते; पण आपल्यामुळे लोकशाही प्रजासत्ताक डळमळीत झाले याची जेव्हा राजकीय वर्गाला जाणीव होईल त्या दिवशी या देशातील लोकशाही वरचे संकट दूर होईल. ही जाणीव निर्माण करण्याची ताकद लोकशक्तीत आहे याचे भान जनतेत असणे तितकेच गरजेचे आहे.

**सुधाकर जाधव**
पांढरकवडा, जि.यवतमाळ मो. ९४२२१६८१५८
ssudhakarjadhav@gmail.com
http://myblog-common-nonsense.blogspot.com/

■■

# पालकमंत्री थोरात यांना फुलंब्रीत शेतकरी संघटनेचा दणका



**फुलंब्री (प्रतिनिधी):** गणोरी, तालुका फुलंब्री येथे शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी पालकमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या सभेत ऊसप्रश्नी जाहीर जाब विचारून त्यांना सभास्थानी जेरीस आणले. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. सभेत सुरुवातीला देवगिरी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष विलास औताडे, तालुकाध्यक्ष सुदामराव मते, शिवाजीराव पाथ्रीकर यांची थोडक्यात भाषणे झाली. यानंतर आमदार डॉ. कल्याण काळे यांचे भाषण सुरू असताना शेतकरी संघटनेचे संतोष तांदळे, जगन्नाथ तांदळे आदींसह इतर कार्यकर्त्यांनी 'आमच्या उसाचे काय?' असा प्रश्न उपस्थित केला; परंतु मा. पालकमंत्री, उपस्थित आमदार आदींकडे त्यांच्या प्रश्नाचे उत्तर नसल्याने ते सभा न घेताच निघून गेले.

याप्रसंगी व्यासपीठावर अजिनाथ धामणे, सभापती संदीप बोरसे, भाऊसाहेब जगझाप, भास्कर मुरमे, लहू मानकापे, सारंग गाडेकर, संतोष मेटे, किशोर बलांडे आदी मान्यवर उपस्थित होते. गोंधळ घालण्याऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी उपस्थित नेत्यांनी फुलंब्री येथील पोलिस निरीक्षक डी. पी. भोये यांच्याशी संपर्क साधून केली आहे.

---

**पान १३ वरून पुढे**

वस्तुंच्या उपभोग वा वापर मूल्य (Use Value) व विनिमय मूल्य (Exchange Value) ही या बाजारातील वस्तुंचे दर ठरवण्याबाबत महत्वाची भूमिका बजावत असतात. खुल्या बाजारात उत्पादक व ग्राहक यांच्या हितासाठी कार्यरत असणाऱ्या शक्ती या दोहोंमध्ये संतुलन राखण्यासाठी प्रयत्नशील असतात. परंतु बंदिस्त बाजार व्यवस्थेत अशा संतुलनाची शक्यताच नसल्याने गाईचे दूध नऊ रूपये लिटर तर पिण्याचे पाणी तेरा रूपये लिटर, एक किलो कांदा व एक कप चहा एकाच किंमतीला, एक किलो गहू व शीतपेयाची बाटली एकाच किंमतीला, एक किलो तांदूळ व कॅडबरी चॉकलेट एकाच किंमतीला अशा विकृती तयार होतात. म्हणजे काही शक्ती या एकतर्फी सक्रीय झाल्याचे दिसते. यात चंगळवाद विरोधाचा भाग नसून आपला खाद्यांन्नावरील खर्चाकडे पाहण्याचा दृष्टिकोन किती विषमतेचा आहे दाखवण्याचा प्रयत्न आहे. इतर वस्तु वा पदार्थांवरील महागाई ज्या अपरिहार्यतेने आपण स्वीकारतो, त्या सहजतेने खाद्यांन्नाची महागाई आपण स्वीकारत नाही हे या साऱ्या घडामोडींमागील कठोर वास्तव आहे.

या साऱ्या महागाईचा रोख व दिशा हा आंतरराष्ट्रीय बाजारातील दरांशी समरूपता साधण्याकडे आहे. ही प्रक्रिया रोखणे हे कोण्या सरकारच्या हाती आहे किंवा नाही हे देखील आज कुणाला सांगता येणार नाही. ही सारी प्रक्रिया किती टप्प्यात वा किती कालावधीत पूर्ण होईल हेही आज सांगणे तसे कठीण आहे. कांहीच्या मते आपण मुक्ततेला प्राधान्य देऊन बंदिस्त व्यवस्थेतील विकृती वा तफावती किती लवकर निवारण करतो यावरही हे अवलंबून आहे. भारतातील बव्हंशी लोकसंख्या ही कृषिक्षेत्रावर अवलंबून आहे आणि अर्थव्यवस्थेतील निर्धारित वाटा जर या लोकसंख्येपर्यंत पोहचून त्यांची क्रयशक्ती वाढली नाही तर आज महाग का होईना मिळणारे खाद्यान्न पुढे मिळेलच की नाही यावर प्रश्नचिन्ह उभे रहायची शक्यता आहे.

या प्रक्रियेकडे दुसऱ्या बाजूनेही बघता येईल. काही अर्थतज्ञांच्या मते वाढता विकासदर, चलनवाढ यांची अपेक्षा ठेवतांना काही प्रमाणात महागाई स्वीकारणे अपरिहार्य ठरते. ही महागाई वाढत्या विकास दराच्या व त्यामुळे वाढलेल्या उत्पन्नाच्या सापेक्ष असते. मागच्या पिढीतील मंडळी त्यांच्या काळातील स्वस्ताईचे गोडवे गातांना तेव्हाचे त्यांचे उत्पन्न किती होते हे सोईस्कररित्या विसरतात. एवढी स्वस्ताई असून देखील त्यांना तेव्हा जेवढी बचत करता आली त्यापेक्षा आजच्या बचतीचे प्रमाण जास्त दिसते. मग कुठली अवस्था चांगली मानायची ? एवढेच नव्हे तर आजचे अमेरिकेतील दर व भारतातील दर यात प्रचंड तफावत आढळते. परंतु या दोन्ही देशातील उत्पन्नाची पातळी लक्षात घेता सारे सहनीय व समर्थनीय वाटायला लागते.

यात मुख्य मुद्दा हा दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या लोकसंख्येचा आहे. या वर्गाची क्रयशक्ती जोवर सक्षम होत नाही तोवर त्यांना रास्त दरात खादान्न मिळायला हवे हे कोणीही मान्य करील. यात सरकारला बरेचसे करता येण्याजोगे आहे. सरकारकडे अन्नधान्याचे पुरेसे साठे असल्याचे सांगितले जाते. यावर सरकार खर्च करीत असलेली प्रचंड अनुदाने ही सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील त्रुटी व भ्रष्टाचारामुळे त्यांच्यापर्यंत पोचत नाहीत. यावर काहीही करण्याची सरकारची मानसिकता आजतरी दिसत नाही. वास्तवात तज्ञांनी फूड स्टँपसारख्या निकोप योजना सूचवून देखील सरकार त्या अमलातही आणत नाही व का आणत नाही याची कारणेही देत नाही, यावरून या सार्वजनिक वितरण व्यवस्थेची सरकार ही प्रमुख लाभार्थी असल्याच्या आरोपाला पुष्टीच मिळते. त्यामुळे आज या महागाईवर चाललेला गदारोळ हा गरिबांचा कैवार दाखवण्याच्या राजकारणाचा एक भाग आहे की काय हे तपासून पाहिले पाहिजे.

**डॉ. गिरधर पाटील**
http://girdhar-liberals.blogspot.com
girdhar.patil@gmail.com

■■